ISSN 2279-0462

# रानवेध

वर्ष : ६ वे अंक :१ व २ जुलै २०१७



वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती

# वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती

WILDLIFE AND ENVIRONMENT CONSERVATION SOCIETY, AMRAVATI.

रजि.नं. ८७/२००१/अम.

# रानवेध

ISSN 2279-0462

वर्ष : ६ वे अंक १ व २ जुलै २०१७



- **संपादक**

  डॉ. जयंत वडतकर

- **कार्यकारी संपादक**

  श्री. किरण मोरे

  सौ. प्राची पालकर

- **संपादक मंडळ**

  प्रा.डॉ. गजानन वाघ

  प्रा.डॉ. श्रीकांत वऱ्हेकर

  प्रा.डॉ. अंजली देशमुख

  प्रा.डॉ. मंजुषा वाठ

- **मार्गदर्शन**

  श्री. मिलींद चिमोटे

  प्रा.डॉ. प्रभा भोगांवकर

- **मुखपृष्ठ**

  श्री. किरण मोरे



- **मुद्रक**

  श्री गुरुदेव प्रिन्टर्स

  शेगांव नाका, अमरावती.

- **प्रकाशक**

  सचिव

  वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती.

  पत्ता : ४२ ग्रिनपार्क कॉलनी, आशियाड जवळ,

  शेगांव रोड, अमरावती–४४४ ६०४

  Email : wecs_2001@yahoo.com

  Website : www.wecsamravati.org



- खाजगी वितरणासाठी, लेखकांचे मत हे त्यांची वैयक्तिक विचारधारा आहे.

# वेकस कार्यकारिणी



प्रा.डॉ. अंजली देशमुख
* अध्यक्ष *



डॉ. जयंत वडतकर
* सचिव *



प्रा.डॉ. गजानन वाघ
* कोषाध्यक्ष *



प्रा.डॉ. श्रीकांत वऱ्हेकर
* उपाध्यक्ष *



प्रा. डॉ. मंजुषा वाठ
* सहसचिव *



सौ. प्राची पालकर
* सदस्य *



श्री. गजानन बापट
* सदस्य *



श्री. अल्केश ठाकरे
* सदस्य *



श्री. किरण मोरे
* सदस्य *



श्री. मिलिंद चिमोटे
माजी महापौर
* सल्लागार *



डॉ. प्रभा भोगावकर
संस्थापक अध्यक्ष
* सल्लागार *



डॉ. राजु कसंबे
संस्थापक सचिव
* सल्लागार *

# संपादकीय...

संस्थेच्या स्थापनेस यावर्षी सोळा वर्ष पूर्ण झालीत, त्यामुळे साहजिकच तरुणवयातील जबाबदारीच्या जाणीवेतुन संस्थेला यापुढील वाटचाल करावी लागणार आहे. गेल्या दोन वर्षात संस्थेच्या नावे काही महत्वाच्या गोष्टींच्या नोंदी झाल्यात, यामध्ये Important Bird areas of Maharashtra ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी आमच्या संस्थेने घेतली व  भारतातील अग्रगण्य संस्था, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी व जगप्रसिद्ध ऑक्सफोर्ड प्रकाशन यांचेसमवेत संस्थेस पुस्तक प्रकाशनाचा मान मिळाला. सन २०१० मध्ये संस्थेने प्रकाशित केलेल्या अमरावती जिल्हा पक्षीसुचीमध्ये संस्थेच्या पक्षीअभ्यासकांनी तब्बल ५२ पक्ष्यांची नव्याने भर घातल्याने या सूचीची सुधारित व दुसरी आवृत्ती २०१६ मध्ये पुन्हा प्रकाशित करावी लागली, या निमित्याने संस्थेने एक महत्वाचा दस्तऐवज उपलब्ध करून दिला. नवीन पक्ष्यांच्या नोंदीशिवाय संस्थेच्या पक्षी अभ्यासकांनी पक्षी संशोधनामध्ये मोठी झेप घेतलीय, यामधून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा व पक्षिमित्र संमेलनांमधील सहभाग व काही लेख व शास्त्रीय निबंधांच्या स्वरुपात महत्वाची प्रकाशने संस्थेच्या सदस्यांच्या नावे लागलीत याशिवाय 'लार्क' या पक्ष्यांचा अभ्यास करीत असताना यातून आंतरराष्ट्रीय च्या दर्जाचा ३० मिनिटांचा एक माहितीपट निर्माण केल्या गेला जो लवकरच रिलीज  करण्यात येईल.

''मातीचे गणपती बसवा, ''निसर्गाशी बांधिलकी दाखवा'' हा जनजागृतीपर कार्यक्रम संस्थेने २००५ मध्ये सर्वप्रथम सुरु केला होता, त्याचे यावर्षी १२ वे वर्ष आहे. या उपक्रमातून उत्सवादरम्यान होणारे जलप्रदूषण कमी करण्याची संकल्पना यशस्वी झाली याचे आम्हास समाधान आहे, अनेक लोक आज प्लॅस्टर ऐवजी मातीच्या मूर्तीची मागणी करावयास लागलेत व त्यामुळे मूर्तीकारांना सुद्धा पुन्हा मातीकडे वळावे लागत आहे, हे या उपक्रमाचे यश आहे असे आम्ही मानतो. संस्थेच्या सदस्यांना त्यांची पर्यावरण क्षेत्रातील कार्यासाठी व वन्यजीव छायाचित्र स्पर्धा ई. मध्ये अनेक पुरस्कार मिळालेत. काही सदस्यांची इतर संस्थेमध्ये निवड झाली तर काहींची विविध पदांवर नियुक्ती झाली याचा संस्थेस अभिमान आहे.

यावर्षी संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या, 'चार कोटी वृक्ष लागवड' या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला असून या अंतर्गत शंभर झाडे लाऊन ती जागविण्याचा संकल्प आहे. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने काही कार्यक्रम आखले आहेत. या मध्ये वेक्स बर्ड फेस्ट, मेळघाट भ्रमण, पक्षीनिरीक्षण, फुलपाखरे निरिक्षण अशा लोकप्रिय कार्यक्रमांचा समावेश आहे. याशिवाय पर्यावरण व वन्यजीव क्षेत्रातील मान्यवरांचे अनुभव ऐकता यावेत म्हणून ''वेक्स व्याख्यानमाला'' हा नवीन उपक्रम यावर्षी सुरु करण्यात आला आहे.

संस्था व संस्थेच्या सदस्यांची मागील दोन वर्ष इतकी व्यस्ततेत गेलीत कि सातत्याने झालेल्या अनेक कार्यक्रमाच्या व्यस्ततेतून रानवेध चे मागील दोन अंक काढणे शक्य झाले नाही. हा अंक नव्या रुपात आपणासमोर येत आहे, यामध्ये वर उल्लेखित विषयांची झलक पहावयास मिळेल तसेच काही अभ्यासपूर्ण लेख व नवोदितांचे साहित्य सुद्धा वाचावयास मिळेल. आपणास आवडेल अशी अपेक्षा.

डॉ. जयंत वडतकर


संपादक

# अभिनंदन

## डॉ. जयंत वडतकर

वेक्स चे संस्थापक सदस्य तथा सचिव डॉ. जयंत वडतकर यांची महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळावर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. महसूल व वन विभागाच्या दि. २८ फेब्रुवारी २०१७ च्या अधिसूचना व्दारे हि नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये डॉ. जयंत वडतकर यांचेसह डॉ. अंकुर पटवर्धन (पुणे), डॉ. आरती संजय शनवारे (नागपूर), डॉ. विनय देशमुख (मुंबई) व डॉ. अधिकराव जाधव (कोल्हापूर) यांचा समावेश आहे. या पूर्वीच्या सदस्यांचा कार्यकाल संपुष्टात आल्यामुळे सदर नियुक्ती करण्यात आली आहे.

आणखी महत्वाचे म्हणजे डॉ. जयंत वडतकर यांची शासन निर्णय दि. २९ जून २०१७ नुसार अमरावती जिल्ह्याच्या मानद वन्यजीव रक्षक पदी पुन्हा एकदा नियुक्ती झाली आहे. ते यापूर्वी सुद्धा २०१२ पासून मानद वन्यजीव रक्षक म्हणून कार्य करीत होते. त्यांच्या या नियुक्तीमुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बर्डेकर डॉ. जयंत वडतकर यांचे अभिनंदन करतांना.

संस्थेच्या वतीने त्यांचे अभिनंदन.

## श्री. अल्केश ठाकरे

वेक्स चे कार्यकारिणी सदस्य श्री. अल्केश ठाकरे हे वन्यजीव क्षेत्रात गेल्या १० वर्षापासून कार्यरत असून सर्प संवर्धनापासून सुरु झालेला त्यांचा हा प्रवास आज वन्यजीव क्षेत्रातील एक समर्पित व्यक्ती अशी ओळख देऊन गेला. आपल्या व्यवसाय सांभाळून ते वेक्स सोबत पक्षी अभ्यास , वन्यजीव संवर्धन व जनजागृती, वन्यजीव सुरक्षा व सुश्रृषा आदी क्षेत्रात कार्यरत असतात. ते उत्कृष्ट वन्यजीव छायाचित्रकार असून, वन्यजीव पर्यटन या क्षेत्रात सुध्दा त्यांनी स्वत:ची त्यांची ओळख निर्माण केली आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या ४५ व्या वर्धापन दिनी दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी त्यांच्या मेळघाटातील वन्यजीव संवर्धन व जनजागृती या क्षेत्रातील विविध कार्यासाठी मेळघाट संचालनालयातर्फे त्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



श्री. अल्केश ठाकरे यांना पुरस्कार देतांना मुख्य वनसंरक्षक श्री. संजीव गौड सोबत अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक श्री. रामबाबु, क्षेत्रसंचालक व मुख्य वनसंरक्षक श्री. श्रीनिवास रेड्डी व वनसंरक्षक श्री.ए.एस.कळसकर आदी.

संस्थेच्या वतीने त्यांचे अभिनंदन.

# अनुक्रमणिका

# रानवेध

## आतील पानात....


| | | |
|---|---|---|
| १) | फुलपाखरांचे उद्यान उभारणी<br>-डॉ. राजु कसंबे | १ |
| २) | सातवी आंतरराष्ट्रीय हॉर्नबील परिषद :<br>वेक्स च्या अभ्यासकांचा सहभाग<br>-डॉ. जयंत वडतकर | ४ |
| ३) | पदभ्रमण एक सर्वांगसुंदर छंद<br>- सौ. प्राची पालकर | ७ |
| ४) | दुर्लक्षीतांचे धनी<br>- श्री. किरण मोरे | ९ |
| ५) | चला करुया गणना सर्वसामान्य पक्ष्यांची<br>-श्री. नंदकिशोर दुधे | ११ |
| ६) | रात्रीचे पक्षीजगत<br>- श्री. शिषिर शेंडोंकार | १३ |
| ७) | बिबट : पहिला थरार...<br>-श्री. प्रशांत तिरमारे | १५ |
| ८) | वेक्स व्याख्यानमाला | १८ |
| ९) | वेक्स वार्तापत्र | २० |

# फुलपाखरांचे उद्यान उभारणी...



**डॉ. राजु कसंबे**
B.N.H.S. Mumbai
Mob. 9004924731

गेल्या काही वर्षात बटरफ्लाय गार्डन वा बटरफ्लाय पार्कची संकल्पना हळूहळू भारतात रुजायला लागली आहे. बटरफ्लाय गार्डन नेमके काय आहे? ते कसे उभारतात? असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात. भारतात अनेक ठिकाणी शासकीय तसेच वैयक्तिक असे अनेक बटरफ्लाय गार्डन आज उभारले गेले आहेत, उभारले जात आहेत.

बटरफ्लाय गार्डन म्हणजे असा बगीचा जेथे अनेक प्रकारची फुलपाखरे एखाद्या छोट्या प्रदेशात कमी वेळात बघता येतील. बटरफ्लाय गार्डन म्हणजेच फुलपाखरांचे उद्यान किंवा बाग होय.

फुलपाखरांच्या उद्यानाला अगदी घटकाभऱ्यासाठी दिलेली भेट आपल्याला फार मोठा आनंद देऊन जाते. सिंगापूर आणि लंडनच्या फुलपाखरांच्या बंदीस्त उद्यानाला दरवर्षी लाखो लोक भेट देतात. दुर्दैवाने भारतात सध्या तरी त्याच्या तोडीचे फुलपाखरांचे उद्यान नाही.

फुलपाखरांची उद्याने मुलतः दोन प्रकारची असू शकतात, खुले तसेच बंदिस्त. फुलपाखरांचे बंदिस्त उद्यान म्हणजे एखाद्या छोट्याशा बागेला जाळ्या लावून चौहू बाजूनी बंदिस्त करून घेतल्यानंतर त्यात विविध प्रजातीची फुलपाखरे पकडून आणून अथवा पैदास करून सोडली जातात. उद्यान बंदिस्त असल्यामुळे फुलपाखरे बाहेर उडून जाऊ शकत नाहीत,

अर्थात जेवढी फुलपाखरे सोडू तेवढी जास्त फुलपाखरे एका ठिकाणी आपल्याला बघायला मिळतात. अशाप्रकारची फुलपाखरांचे बंदिस्त उद्याने जेंटींग आयलंड (सिंगापूर), सिंगापूर विमानतळ, लंडन तसेच इतर अनेक ठिकाणी आहेत.

सिंगापूरचा बटरफ्लाय पार्क म्हणजे हिरव्या जाळ्या लावून पिंजऱ्यासारखा बंदीस्त करण्यात आलेला अख्खा बगीचा होय. ह्या बगीच्यात अनेक प्रजातीची रंगी-बेरंगी मोठी आणि सुंदर शेकडो फुलपाखरे दररोज सोडली जातात. खरे तर त्याकरिता फुलपाखरांचे शेकडो कोशीत विकत घेतले जातात. हे कोशीत विविध ठिकाणांवरून आयात केले जातात. हे कोशीत पुरविण्याचा मोठा व्यवसाय निर्माण झाला असून त्याद्वारा हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आपल्या देशातील (विशेषतः हिमालयातील आणि सह्याद्री पर्वतरांगातील) आदिवासींना अशा प्रकारचा रोजगार उपलब्ध करून देणे सहज शक्य आहे. त्यासाठी भारतीय वन्यजीव संवर्धन कायद्यामध्ये थोडी लवचिकता आणणे आवश्यक आहे.

या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की आपल्या देशात फुलपाखरांचे बंदिस्त उद्यान उभारायला खूप साऱ्या परवानग्या घ्याव्या लागतात. ज्या एखाद्या सामान्य व्यक्तीला त्याच्या हयातीत मिळविणे शक्य होणार नाही ! त्याचे कारण असे की फुलपाखरांचे बंदिस्त उद्यान हे एक प्राणी संग्रहालय (Zoo) मानले जाते आणि फुलपाखरे सुद्धा वन्य प्राणी असल्यामुळे त्यांना भारतीय वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ लागू होतो. तसेच झू ऑथॉरिटी ऑफ इंडियाची परवानगी घेणे अनिवार्य ठरते. जी मिळणे अत्यंत जिकीरीचे काम ठरते. अनेक शासकीय प्राणी संग्रहालयांना सुध्दा झू ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या नियमांची धास्ती असते !

दुसरा पर्याय म्हणजे फुलपाखरांचे खुले उद्यान उभारणे ! खुल्या उद्यानात फुलपाखरांना बंदीस्त केलेले नसते, तर त्यांच्या सर्व नैसर्गिक गरजा पूर्ण होत असल्याने फुलपाखरेच येथे मोठ्या संख्येत जमतात. फुलपाखरे स्वतःहून ह्या उद्यानात येतात-जातात. मुक्तपणे बागडतात. फु लपाखरांच्या खुल्या उद्यानाचा हा पर्याय त्या मानाने सोपा आणि अमलात आणण्याजोगा आहे. सुदैवाने, आज तरी फुलपाखरांचे खुले उद्यान उभारण्यासाठी कुठलीही परवानगी घ्यावी लागत नाही. महाराष्ट्रातील ठाणे शहरात ओवळा येथे येउरच्या जंगलाला लागून उभारण्यात आलेला ओवळेकर वाडी बटरफ्लाय गार्डन ह्याचे सुंदर उदाहरण होय. राजेंद्र ओवळेकर ह्या उत्साही निसर्गवेड्या शिक्षकाने स्वतःच्या वाडीत, स्वखर्चाने हे फुलपाखरांचे खुले उद्यान विकसित केले आहे.

फुलपाखरांचे खुले उद्यान उभारण्यासाठी उद्यानायोग्य जागा, मनुष्यबळ, फुलपाखरांबद्दल तसेच वनस्पतींबद्दलचे शास्त्रीय ज्ञान, भूप्रदेशाच्या नियोजनाचे (Landscaping) थोडे फार ज्ञान आणि आर्थिक तयारी ह्या गोष्टींची आवश्यकता असते. उद्यान जनतेसाठी खुले करून त्याद्वारे आर्थिक मिळकत कमवायची असेल तर प्रचार कौशल्य व व्यवस्थापन कौशल्य जरुरी आहे. केवळ स्वतःच्या आनंदासाठी उद्यान उभारायचे असेल तर मात्र प्रचार कौशल्य जरुरी नाही.

### उद्यानायोग्य जागा:

फुलपाखरांचे खुले उद्यान उभारायचे असेल तर ज्या प्रदेशात फुलपाखरांची भरपूर विविधता आहे (जंगलातील खाजगी जमिनी), किंवा जंगलाला लागून असलेली जागा (उदा. शेतजमीन), किंवा शहराच्या सीमेवरील जमीनी अशा प्रकारच्या जागा निवडता येतील. मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झालेल्या भागात मध्यवस्तीत, कोरड्या प्रदेशात, ओसाड ठिकाणी (जेथे वनस्पती उगवणार नाहीत) अशा जागा टाळाव्यात. भारतात वाळवंटी प्रदेश, बर्फाच्छादित प्रदेश आणि शुष्क गवताळ प्रदेश सोडले तर इतर ठिकाणी फुलपाखरांचे खुले उद्यान उभारले जाऊ शकते.

### मनुष्यबळ:

फुलपाखरांचे खुले उद्यान उभारायचे म्हणजे त्यासाठी उद्यानाच्या क्षेत्रफळाप्रमाणे मनुष्यबळ लागते. त्यामध्ये फुलपाखरांबद्दल तसेच वनस्पतींबद्दल शास्त्रीय ज्ञान असणाऱ्या व्यक्ती, पूर्ण वेळ उद्यानाची काळजी घेणारे माळी तसेच सर्व व्याप सांभाळणारा व्यवस्थापक किमान जरुरी असतो.

### फुलपाखरांच्या गरजांचे शास्त्रीय ज्ञान:

एकदा का फुलपाखरांच्या खुल्या उद्यानाची जागा निश्चित झाली की मग आवश्यक असते ते फुलपाखरांच्या गरजांचे शास्त्रीय ज्ञान. आपण खुल्या उद्यानामध्ये फुलपाखरे पकडून अथवा बंदिस्त ठेऊ शकत नसल्यामुळे आपल्या जवळ एकच पर्याय उरतो, तो म्हणजे त्यांना आकर्षित करणे ! त्यासाठी त्यांच्या गरजा आपल्याला स'जल्या तर पूढील कामाला दिशा मिळते.

१.सुरवंटाच्या खाद्य वनस्पती (larval host plant): फुलपाखरांचे जीवनचक्र चार अवस्थामध्ये पूर्ण होते. अंडी (egg), सुरवंट (caterpillar), कोशित (pupa) आणि फुलपाखरू. प्रत्येक फुलपाखरू एका किंवा अनेक पण काही विशिष्ट वनस्पतींवरच स्वतःची अंडी घालते. उदाहरणार्थ, प्लेन टायगर नावाचे फुलपाखरू रुईच्या पानावर, कॉमन क्रो नावाचे फुलपाखरू कण्हेरीच्या पानावर, तर कॉमन मोरमॉन नावाचे फुलपाखरू लिंबू व कढीपत्त्याच्या पानांवर अंडी घालते. त्या अंड्यामधून निघणारा सुरवंट त्याच वनस्पतीची कोवळी पाने खाऊन गुजराण करतो, वाढतो, व कालांतराने त्याचे कोशितामध्ये रुपांतर होते. त्या कोशितामधून निघणारे फुलपाखरू हे संपूर्ण वाढ झालेले वयस्क फुलपाखरू असते (ते पिलू वगैरे नसते). त्यामुळे आपल्या बागेत जेवढ्या प्रजातीच्या फुलपाखरांच्या खाद्य वनस्पती (Larval Host Plants) उपलब्ध असतील तेव्हढ्या प्रकारची फुलपाखरे आपल्या बागेत प्रजनन करु शकतील. अशा प्रकारे जन्माला आलेली फुलपाखरे त्यांच्या सर्व गरजा त्याच परिसरात पूर्ण झाल्या तर त्याच परिसरात राहण्याची जास्त शक्यता असते. आपल्या परिसरात आढळणाऱ्या फुलपाखरांच्या जास्तीत जास्त खाद्य वनस्पती शोधून त्यांचे रोपण करावे, त्यांची बाग फुलवावी. वनस्पतींच्या वैविध्याची समृध्दी म्हणजेच आपल्या उद्यानात मुक्कामास येणाऱ्या आणि प्रजनन करणाऱ्या प्रजातींची समृध्दी होय ! उद्यानाच्या दृष्टीने कुठल्या वनस्पती महत्वाच्या आहेत ते माळ्याला वेळोवेळी समजावले गेले पाहिजे. अन्यथा निरुपयोगी तण (weeds) म्हणून फुलपाखरांच्या खाद्य वनस्पतीच उपटून काढायचा. अनेक प्रजातींची फुलपाखरे गवतावर अंडी घालतात हे येथे लक्षात घ्यावे.

## २. फुलपाखरांच्या आवडी-निवडी:

फुलपाखरांना दात नसल्यामुळे त्यांना कुठलेही घन अन्न खाता येत नाही. तसेच जन्मतःच त्यांची पूर्ण वाढ झालेली असल्यामुळे त्यांना वाढ होण्यासाठी आहार घेणे गरजेचे नसते. ते केवळ द्रव रुपी आहार त्यांच्या शुंडेद्वारे शोषून घेतात.फुलपाखरांना उडण्यासाठी उर्जा मिळावी म्हणून ते भरपूर शर्करा असलेल्या फुलामधील मधुरस (nectar) अथवा सडक्या-कुजक्या फळांमधील रस शोषून घेतात.

### मधुरस-प्रिय फुलपाखरे:

अनेक प्रजातीच्या फुलपाखरांना फुलांमधील मधुरस आवडतो. त्यामुळे फुलांमध्ये अधिक मधुरस असणारी फुलझाडे तर कुठल्याही फुलपाखरांच्या खुल्या उद्यानाची शानच वाढवितात. फुलझाडांची निवड अशा प्रकारे केली जावी की वर्षभर उद्यानात फुले उपलब्ध असतील. अनेक प्रजातीच्या घाणेरीची (Lantana) झुडुपे, इक्झोराची (Ixora) झुडुपे, पेंटास (Pentas lanceolata) आणि अशा अनेक प्रकारच्या झुडुपांची अनुभवाप्रमाणे लागवड करायला पाहिजे. प्रत्येक प्रजातीच्या फुलपाखराची शुंडा (proboscis) ही कमी-अधिक लांबीची असते. त्याप्रमाणे फुलपाखरांची फुलांची निवड सुध्दा वेगवेगळी असते. आखूड शुंडा असलेल्या फुलपाखरांना (जसे लायसेनिडी व हेस्परिडी कुळातील काही फुलपाखरे) लांब फुलातील मधुरस मिळविणे शक्य नसते. लांब शुंडा असलेल्या फुलपाखरांना (जसे पापिलीनिडी व हेस्परिडी कुळातील काही फुलपाखरे) लांब फुलातील मधुरस मिळविणे सोपे जाते. म्हणून उद्यानात विविध आकाराची फुले वर्षभर उपलब्ध असणे सुध्दा महत्त्वाचे आहे.

आणखी एक मजेदार गोष्ट अशी की आपला सर्वांचा

आवडता गुलाब हा फुलपाखरांच्या दृष्टीने एकदम निरूपयोगी वनस्पती होय. त्यामुळे उद्यानात गुलाबाची लागवड करून जागा, श्रम व पैसे व्यर्थ खर्च करू नये. त्यावर कुठलेही फुलपाखरू आकर्षित होत नाही.

### मधुरस-नावडणारी फुलपाखरे:

सर्वच प्रजातीच्या फुलपाखरांना फुलं आवडतात हे काही खरे नाही. अनेक प्रजातीच्या फुलपाखरांना फुलं अजिबात आवडत नाहीत. अशा फुलपाखरांना केवळ उग्र दर्प असलेली सडकी-कुजकी फळे, प्राण्यांचे मल-मुत्र, तसेच ओलसर जागा आवडतात. त्यांना आवश्यक ती द्रव्ये ती अशा ठिकाणी मिळवतात. त्यामुळे अशा फुलपाखरांसाठी उद्यानात एखाद्या भांड्यात सडकी-कुजकी फळे झाडाला लटकवून (मुग्या लागू नयेत ह्या उद्देशाने) ठेवतात. अशा सडक्या-कुजक्या फळांवर भरपूर फुलपाखरे आकर्षित होतात. अशा फुलपाखरामध्ये अनेक प्रजातीची ब्राऊन फुलपाखरे, कॉमन नवाब, ब्लॅक व टॉनी राजा, ब्लू ओकलीफं, कॉमन बॅरन, गॉडी बॅरन, आदींचा समावेश होतो. साधरणतः निम्फालिडी कुळातील फुलपाखरे विशेषतः ह्या प्रकारात मोडतात.

### ३. भूप्रदेशाचे नियोजन (Landscaping):

फुलपाखरांचे खुले उद्यान उभारताना सुरुवातीपासूनच भूप्रदेशाचे कसे नियोजन करायचे आहे त्या गोष्टी स्पष्ट असायला हव्या. उद्यानामध्ये माळी तसेच उद्यानाला भेट देणाऱ्या व्यक्तींसाठी पध्दतशीर नियोजित केलेले पथमार्ग असावेत. ते सिमेंटचे असणे जरुरी नाही. त्याचे नियोजन अशाप्रकारे केलेले असावे की फुलांच्या ताटव्याजवळ जाताना इतर वनस्पती तुडवल्या जाऊ नयेत.

फुलपाखरांच्या दृष्टीने कोवळे उन फार महत्वाचे असते. फुलपाखरे शीत रक्ताचे जीव असल्यामुळे दररोज त्यांना स्वतःच्या शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी उन्हात पंख शेकत बसावे लागते. त्यामुळे उद्यानात भरपूर उन्हं पडणारे भाग राहतील याची काळजी घ्यावी. अशा भागात फुलांचे ताटवे व सुरवंटाच्या खाद्य वनस्पतीचे वाफे तयार करावेत.

अर्थात मोठी झाडे लावताना उद्यानाच्या मोजक्याच अथवा विशिष्ट भागात सावली पडेल अशी खबरदारी घ्यावी. उद्यानाची जागा मोठी असल्यास अशी झाडे उद्यानाच्या पूर्व दिशेला लावावीत. जागा कमी असल्यास पश्चिम दिशेला लावावीत. अनेक वनस्पतींना चांगली वाढ होण्यासाठी तसेच फुलं येण्यासाठी भरपूर उन्हं लागतं. अशा वनस्पती भरपूर उन्हं पडेल अशा ठिकाणी लावाव्यात.

उद्यानात एक रोपवाटिका राखली जावी. शक्य तितक्या सुरवंटाच्या खाद्य वनस्पतींची थोडी रोपं इथे जाळीबंद आणि सुरक्षित ठेवावीत. कारण उद्यानात अनेकदा काही रोपटी मरून जातात तर काही रोपटी खादाड सुरवंट संपवून टाकतात. अशा वेळेस दूरवरून मिळविलेली सुरवंटाची खाद्य वनस्पती उद्यानात टिकवून ठेवता येते.

उद्यानाच्या जागेत कुठे नैसर्गिक खोलगट भाग असेल तर त्या जागेवर चिखल निर्माण होईल अशा दृष्टीने जास्त जलसिंचन करावे. चिखलाच्या कडेला बारीक वाळू टाकून ओलसर वाळूचा भाग तयार करावा. बऱ्याच फुलपाखरांना अशा जागा चिखलपाण (mud-puddling) करायला आवडतात.

प्रजातीनिहाय फुलांचे ताटवे फुलवले तर उद्यानाला सौंदर्य तर प्राप्त होतेच, सोबतच कुठली फुलपाखरे कुठे शोधायची ते सोपे होते. संपूर्ण उद्यानात झाडांना पाणीपुरवठा करणारी प्रणाली (जसे ठिबक सिंचन अथवा तुषार सिंचन) सुरुवातीलाच बसवून घ्यावी. दररोज फुलझाडांना पाईपने पाणी घालण्यासाठी जास्त मनुष्यबळ तसेच खर्च लागतो.

### ४. आर्थिक नियोजन:

फुलपाखरांचे खुले उद्यान उभारायची सुरुवात करण्यापूर्वी त्याला बऱ्यापैकी खर्च येतो आणि लागलीच उत्पन्न मिळेलच याची शाश्वती नसते, ह्या गोष्टी मनात ठेवणे जरुरी आहे. उद्यानासाठी लागणारी जागा (मोफत वा स्वतःची) उपलब्ध असेल तर त्यामानाने कमी खर्च येतो. पण विविध वनस्पतींची रोपे विकत आणणे, उद्यानाला लागणारा मासिक खर्च (पाणी, विद्युत बिल, कर्मचाऱ्यांचे पगार, तज्ञांचे मानधन इ.) हा गृहीत धरून चालावे. एकदा उद्यान उभारून झाले की काम संपले असे होत नाही. त्याची योग्य प्रकारे निगा राखली गेली नाही तर आपणास निरूपयोगी असलेल्या वनस्पतींची (weeds) अनियंत्रित वाढ होऊन आपण लावलेली रोपे मरून जातात. कालांतराने उद्यानास अवकळा येते.

### ५. महत्त्वाची खबरदारी :

महत्त्वाची एक खबरदारी अशी की उद्यानात कुठल्याही प्रकारचे कीटनाशक, कीडनाशक, तृणनाशक रासायनिक द्रव्य (insecticides, pesticides, weedicides) वापरू नये. त्यामुळे फुलपाखरांचे सुरवंट (अर्थात फुलपाखरेच की) मृत्युमुखी पडून पर्यायाने फुलपाखरांची संख्या घटते ! खत म्हणून केवळ नैसर्गिक सेंद्रिय खत वा शेणखत अथवा तत्सम खतांचाच उपयोग करावा. उद्यानातच एखाद्या कोपऱ्यात झाडांचा पालापाचोळा सडवून त्यापासून नैसर्गिक खत तयार केले तर खत विकत घेण्याचा खर्च वाचू शकतो.

*****

# सातवी आंतरराष्ट्रीय हॉर्नबील परिषद : वेक्स च्या अभ्यासकांचा सहभाग



**डॉ. जयंत वडतकर**
९८२२८७५७७३
jayantwadatkar.wecs@gmail.com

हॉर्नबील-अगदी कुणालाही सहज ओळखता येणारी पक्षी प्रजाती, लांब - खाली वाकलेली चोच, अन चोचीवर शिंगासारखा वाढलेला भाग (casque) असं याचं वेगळंच रूप. काही प्रजातींमध्ये हे शिंग विविध आकारात व बरेच मोठे वाढलेले असते. मध्यम ते मोठ्या आकाराचे हे पक्षी इतर पक्ष्यांप्रमाणे उत्क्रांती न झालेले किंवा परिस्थितीनुरूप जुळवून न घेऊ शकल्यामुळे बदलले नाहीत म्हणूनच आजही जुन्या काळातील म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा पृथ्वीतलावांवरील आढळ हा जुन्या जगात (so called old world) म्हणजेच आफ्रिका व आशिया खंडात सीमित आहे. या पक्षाला आजही जुन्या जंगलातील जुनी झाडं खाद्यासाठी अन मोठाल्या झाडातील ढोली ह्या घरटे करण्यासाठी लागतात. विणीच्या हंगामात मादी पक्षी घरट्याच्या ढोलीत स्व:ताला दोन-तीन महिनेपर्यंत कोंडून घेते व तेथे अंडी देऊन पिल्ले मोठी होई पर्यंत आपली सारी पिसं गाळून आतच कोंडून राहते. या काळात ढोलीच्या बारीक फटीतून नर पक्षी मादीला खाद्य पुरवितो. अशी मजेशीर जन्मकथा असलेल्या या पक्ष्याच्या आज जगभरात आढळणाऱ्या एकूण ५७ प्रजातींपैकी जवळपास ३२ प्रजाती ह्या आशिया खंडात तर २५ प्रजाती ह्या दक्षिण आफ्रिके मधील देशात सापडतात. भारतात यापैकी ०९ प्रजाती आढळत असून यापैकी ग्रे हॉर्नबील (राखी धनेश) हा पक्षी केवळ भारतातच आढळतो (endemic to India). महाराष्ट्रात हॉर्नबील च्या एकूण चार प्रजाती आढळत असून यापैकी मलबार ग्रे हॉर्नबील हा प. घाटातच आढळतो (प. घाट प्रदेशनिष्ठ / Endemic to Western Ghat).

हॉर्नबील पक्षी हा जंगलातील वृक्ष प्रजातींचा बीजप्रसार करण्यात महत्वाची भूमिका बजावत असून जंगलं वाढतात ती या पक्षांमुळे. परंतु गेल्या शतकभरात  शेतीसाठी, लाकडांसाठी झालेली जंगलतोड व अलीकडे काही देशात चहा, कॉफी, रबर, पाम ची झाडं लावण्यासाठी साफ होत असलेली नैसर्गिक जंगलं, जुन्या झाडांची कत्तल व वणव्यामुळे जळणारी जुनी झाडे; यामुळे या पक्ष्यांचे अधिवास मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहेत व अजूनही होत असल्यामुळे या पक्ष्याच्या प्रजाती जगभरात झपाट्याने कमी होत आहेत.

हॉर्नबील संवर्धनाची गरज ओळखून त्यांचे संशोधन, संवर्धन करणाऱ्या जगभरातील हॉर्नबील अभ्यासकांची चर्चा घडवून आणण्यासाठी हॉर्नबील फाउंडेशन तर्फे दर चार वर्षांनी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षीची सातवी आंतरराष्ट्रीय हॉर्नबील परिषद, मलेशियातील सारावाक स्टेट ची राजधानीचे शहर असलेल्या कुचींग येथे दि, १६ ते १८ मे २०१७ दरम्यान नुकतीच पार पडली असून मलेशियाचा सारावाक फॉरेस्ट्री विभाग, हॉर्नबील फाउंडेशन व युनिव्हर्सिटी ऑफ मलेशिया यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेस हॉर्नबील पक्षी प्रजातींचा आढळ असणाऱ्या आशिया व आफ्रिका खंडातील तब्बल १५ देशातील अभ्यासक व संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांचे जवळपास १५० प्रतिनिधीं या परिषदेमध्ये सहभागी झाले होते. या परिषदेस भारतातुन सुद्धा एकूण आठ अभ्यासक सहभागी झाले होते. यामध्ये पूर्वोत्तर राज्यांमध्ये हॉर्नबील संवर्धन व संशोधनासाठी कार्य करणाऱ्या अपराजिता दत्ता व रोहित नानिवडेकर, दक्षिण भारत व प. घाटात हॉर्नबील अभ्यास करणाऱ्या दिव्या मुदप्पा व पूजा पवार, SACON मधील संशोधक पी. बालसुब्रामनियन व विदर्भातातून आम्ही तिघे डॉ. जयंत वडतकर, प्रा. डॉ. गजानन वाघ व डॉ. अनिल पिंपळापुरे हे सहभागी झालो होतो.

सारावाक हा प्रदेश हा मलेशिया या देशाचे एक राज्य असून, मलेशिया ची मुख्य भूमी व क्वालालंपूर पासून साधारणता हजार किमी अंतरावर असलेला व हॉर्नबिल चा प्रदेश (Land of

Hornbills) अशी ओळख असलेला हा प्रदेश बोर्नेओ बेटावर सबाह व इंडोनेशिया या देशांना लागून उत्तरेकडील बाजूस वसलेला आहे. जगातलं तिसऱ्या मोठ्या आकाराचा असलेलं बोर्नेओ बेट हा प्रदेश म्हणजे उष्णकटीबंधीय सदाहरित वर्षावनांचा प्रदेश नोव्हेंबर ते मार्च या मान्सूनच्या काळात येथे भरपूर पाऊस पडतो व वर्षभर सुद्धा अधूनमधून पाऊस पडतो त्यामुळे येथील जैवविविधता अतिशय संपन्न अशी आहे. ओरांग उटांग, प्रोबोसीस मंकी व गिब्बन या माकडांच्या प्रजातींसह येथील पक्षी विविधता संपन्न अशी आहे. हॉर्नबिल हा येथील महत्वाचा पक्षी, सारावाक मध्ये हॉर्नबिल च्या आठ प्रजाती सापडतात. यातील रायनोसिरोस हॉर्नबिल हा येथील संस्कृतीचा एक अविभाज्य घटक बनलेला आहे. याची प्रचीती आपणास कुचींग शहर असो कि सारावाक मधील कुठल्याही ठिकाणी वेळोवेळी येते.

कुचींगच्या छोटेखानी पण सुंदर अश्या विमानतळावर उतरलो की तेथूनच आपल्याला हॉर्नबिल च्या प्रतिकृती दिसू लागतात, कुचींग कडे जाणाऱ्या एका उड्डाणपुलाच्या कडेला शंभरेक फुट उंचीचा रायनोसिरोस हॉर्नबिलचा पुतळा लक्ष वेधून घेतो. पुढे शहरात गेलो कि चौकातील कारंजी असो की हॉटेल मधील नक्षीकाम, ठिकठिकाणी हॉर्नबिल काढलेला. मार्केट मध्ये फिरताना रात्री रस्तांवर विद्युत दिव्यांच्या रोशनाई मध्ये लखलखनारे हॉर्नबिल, टी-शर्ट वर, कि चेन वर, भेटवस्तुंवर - जिकडे तिकडे हॉर्नबिल. जहाजावर, बोटींवर, घरांच्या टोकावर, इतकंच काय तर त्यांच्या राजचिन्हात सुद्धा हॉर्नबिल. त्यांच्या पारंपारिक कलाकुसरीत लाकडात कोरलेले हॉर्नबिल दिसतात. अश्या या निसर्गसंपन्न व हॉर्नबिल प्रेमी प्रदेशाची राजधानी असलेले कुचींग हे शहर सारावाक या नदीकिनारी वसलेलं एक टुमदार, स्वच्छ व आतिथ्यशील असं गाव असून या शहराची ओळख कॅट सिटी अशी आहे. स्थानिक भाषेत कुचींग म्हणजे मांजर म्हणून कॅट सिटी. या शहरात भटकी कुत्री, गाय, पाळीव प्राणी आम्हाला ४-५ दिवसात कधीही दिसले नाहीत, मांजरी अन मांजरीचे पुतळे मात्र भरपूर दिसलेत. अख्ख्या कुचींग जिल्ह्याची लोकसंख्या अवघी सव्वातीन लाख मात्र या शहरात पंचतारांकित हॉटेल पासून ते डॉलर एक्सचेंज पर्यंत सारी व्यवस्था. साऱ्या शहरभर चढ-उताराचे नागमोडी रस्ते, यावरून गाड्या सुसाट धावतात मात्र सिग्नलवर व झेब्रा क्रॉसिंग वर कुणी असो वा नसो, गाड्या थांबणार म्हणजे थांबणारच, ४-५ दिवसात आम्ही गाडीचा हॉर्न कधीही ऐकला नाही, अन विशेष म्हणजे कुठेही ट्रफिक पोलीस नाही. अश्या या सुंदर व निसर्गसंपन्न शहरात आम्ही परिषदेच्या आधल्या दिवसी दुपारीच पोहचलो. येथील आमचा मुक्काम "हार्बर व्ह्यू" या सारावाक नदीकिनारी वसलेल्या सुन्दर अश्या हॉटेल मध्ये होता. हॉटेलच्या आमच्या आठव्या मजल्यावरील खोलीतून नदीचे सुंदर दृश्य, नदीकाठचा चौपाटीसारखा रस्ता, त्या बाजूनेच जाणारा व हिरवळीने वेढलेला नागमोडी वाहनांचा रस्ता असे दृश्य अतिशय सुंदर दिसत होते. हॉटेल समोरच सर्वात जुने चायनीज टेम्पल व चायनीज म्युजीयम होते. परिषदेचे ठिकाण असलेलं "हॉटेल रिव्हर साईड मेजीस्टीक" हे तेथून अवघ्या २ मिनिटाच्या अंतरावर. सायंकाळी जेवायला बाहेर पडलो तेव्हाच परिषदेचे ठिकाण पाहून ठेवले, काहींच्या भेटीही झाल्यात.

परिषदेचे पुढचे तीन दिवस अत्यंत व्यस्त असे होते. दि. १६ मे ला पहिल्या दिवसी सकाळी ८ वा. नोंदणी व १० वाजता उद्घटना पासून सुरु झालेली परिषद पुढचे तीन दिवस भरगच्च, रोज सायं. ६ पर्यंत सादरीकरणं चालायची. उद्घाटनाचा कार्यक्रम अतिशय सुटसुटीत, व पारंपारिक पद्धतीने, एका लांब बांबूच्या नळीतून बलूनवर तीर मारून उद्घाटन करण्यात आले. मोजकी भाषणं झाली. अन त्यानंतर मुख्य भाषण हॉर्नबिल संवर्धनात गेल्या ३५ वर्षापासून कार्यरत असलेल्या व थायलंड हॉर्नबिल फौंडेशन च्या माध्यमातून जगभरातील हॉर्नबिल संशोधकांना या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून एकत्र आणणाऱ्या व ज्या बाईला जगभरात हॉर्नबिल ची माता (Great Mother of Hornbill) म्हणून ओळखल्या जाते त्या प्रोफेसर पिलाई पुनस्वाड यांचे होते. त्यानंतरच्या सत्रातील मुख्य सादरीकरणामध्ये भारतातील नावाजलेल्या हॉर्नबिल संशोधक व संरक्षक अपराजिता दत्ता, आफ्रिकेतील जेष्ठ हॉर्नबिल संशोधक एलेन केम्प यांची मुलगी ल्युसी केम्प, मलेशिया चा येप चीन व थायलंड चे डॉ. विजाक या अनुभवी अभ्यासकांचा समावेश होता. या परिषदेमध्ये हॉर्नबिलचा आढळ असणारे देश व संवर्धनाची नितांत गरज असलेले आशिया खंडातील थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया,

भारत, भूतान, श्रीलंका व द. आफ्रिका अश्या एकूण १५ देशांचे एकूण १५० प्रतिनिधी व अभ्यासकांनी आपली हजेरी लावली होती. त्यापैकी जवळपास ३६ सादरीकरणे या तीन दिवसात झालीत. या परिषदेचे वैशिष्ठ म्हणजे सर्व उपस्थित फक्त हॉर्नबिल संवर्धन, संशोधन व अभ्यास या एकाच विषयाभोवती जुळलेले, त्यामुळे इतर काही परिषदेप्रमाणे फक्त प्रमाणपत्र पुरती हजेरी लावणारे सहभागी येथे नसतात. येथील प्रत्येकजन प्रत्येक सादरीकरण ऐकण्यासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी उत्सुक असतो. विदर्भातातून आम्ही तिघे डॉ. जयंत वडतकर, प्रा. डॉ. गजानन वाघ व डॉ. अनिल पिंपळापुरे व हॉर्नबिलवर संशोधन करून आचार्य पदवी मिळविलेले डॉ. राजू कसंबे असे चौघेजण गेल्या १० वर्षापासून विदर्भातील हॉर्नबिल वर अभ्यास करीत आहोत व त्यावर आधारित विदर्भातील हॉर्नबील प्रजातींची सध्यस्थिती व त्यांचा भौगोलिक विस्तार तसेच शहरातील ग्रे हॉर्नबील पक्ष्याच्या विणीच्या हंगामातील खाद्य, या दोन विषयावर आम्ही आमचे शोध निबंध मांडलेत. आम्ही या चळवळी मध्ये गेल्या आठ वर्षापासून सक्रीय असून आम्ही यापूर्वी २००९ मध्ये सिंगापूर येथील पाचव्या व २०१३ मध्ये फिलिपाईन्स येथील सहाव्या परिषदेमध्ये सुद्धा आपले संशोधन सादर केले होते.

परिषदेच्या तीन दिवसामध्ये, सादरीकरणा शिवाय झालेल्या महत्वाच्या गोष्टी म्हणजे; पहिल्या दिवशी रात्री सारावाक संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या पारंपारिक नृत्यासोबत स्वागतपर भोजन, शेवटच्या दिवशी तज्ञ व सत्रअध्यक्ष यांचे चर्चासत्र व संशोधन व संवर्धनासाठी झालेले काही महत्वपूर्ण ठराव व समारोपाच्या नंतर मतांग वाईल्डलाइफ सेंटर ला झालेली भेट.

कुचींग शहरापासून ३५ कि.मी अंतरावर असलेले मतांग वाईल्डलाइफ सेंटर म्हणजे उष्णकटीबंधीय सदाहरित वर्षावन असलेले कुबाह राष्ट्रीय उद्यानामधील वन वनविभागाचा एक भाग. येथे ओरांग उटांग या दुर्मिळ जातीच्या माकडाचे संशोधन, नैसर्गिक प्रजनन व पुनर्वसन केंद्र आहे, शिवाय इतर प्राणी व हॉर्नबिल पक्ष्यांसाठी सुद्धा बचाव व पुनर्वसन केंद्र आहे. लगतच्या जंगलात हॉर्नबिल संख्या वाढीसाठी वड - पिंपळ ही खाद्य वनस्पती व काही घरटी करण्यास उपयोगात येणारी वृक्ष प्रजातींचे वृक्षारोपण कार्यक्रम राबविला जातो; त्याला ते फिग गार्डन प्रकल्प म्हणतात. ७२ चौ. किमी च्या या फिग गार्डन मध्ये त्यांनी आमच्या सर्वांच्या हाताने प्रत्येकी एक झाड लावून घेतले. त्यानंतर या सेंटर मधील ओरांग उटांग व इतर केंद्राला भेटी व जंगल भ्रमण असा कार्यक्रम आखला होता. येथे अनेक ओरांग उटांग जवळून पाहता आलेत. उष्णकटीबंधीय सदाहरित वर्षावन काय असते; हे त्यादिवशी शरीरातून निघालेल्या घामावरून कळले. येथील जंगल अनुभवता आले, काही पिंजऱ्यात ठेवलेले हॉर्नबिल व जंगलातील पक्षी सुद्धा पाहता आलेत.

या परिषदे दरम्यान आम्हाला जगभरात सुरु असलेले हॉर्नबिल विषयक संशोधन, या प्रजातीस विविध ठिकाणी असलेल्या विविध समस्या व त्यांच्या संवर्धनासाठी होत असलेल्या उपाययोजना याची माहिती तर मिळालीच याशिवाय आमच्यासाठी घडलेल्या महत्वाच्या घडामोडी म्हणजे भारतातील सर्व अभ्यासकांचा झालेला परिचय, आपल्या देशातील हॉर्नबिल अभ्यास बाबत झालेली चर्चा व भविष्यात करावयाची कामे याबाबत चर्चा झाली. भारतात काही मिटिंग व चर्चासत्र घेण्याचे व त्यातून हॉर्नबिल संवर्धनासाठी आणखी काम करावयाचे सुद्धा ठरविले. शिवाय पुढील आठवी परिषद भारतात घेण्याविषयी जेष्ठ अश्या अपराजिता दत्ता यांनी प्रस्ताव ठेवावा यावर एकमत झाले. त्यानुसार अपराजिता यांनी तसा प्रस्ताव सुद्धा ठेवला परंतु आपला शेजारी मित्र देश भूतान या देशाने दिलेल्या प्रस्तावावर आयोजकांनी शिक्कामोर्तब केले. आता पुढील परिषद चार वर्षांनी भूतान येथे होणार असून तेथील मित्रांनी आम्हाला पुढील परिषदेचे खास निमंत्रण सुद्धा दिले. चार वर्षांनी पुन्हा भूतानला भेटू या असे ठरवून आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

*****

# पदभ्रमण एक सर्वांगसुंदर छंद



**सौ. प्राची पालकर**
९८२३०४९११९८
कार्यकारिणी सदस्या, वेक्स
prachipalkar.lic@gmail.com

पदभ्रमण करणे म्हणजे काय तर निर्धारित लक्ष्य चालत पूर्ण करणे. पूर्वी दळणवळणाची साधने कमी होती, वाहनांची संख्याही कमी त्यामुळे सक्तीचे पदभ्रमण होत असे. आता मात्र सगळीकडे वाहनांची रेलचेल, त्यामुळे ठरवून असे कार्यक्रम केल्या जातात. आपण सगळे पर्यटनप्रेमी व निसर्गप्रेमी आहोत, भटकंती हि प्रत्येकाला आवडतेच; पण काही वाटा अश्या असतात ज्यावरील सौंदर्य फक्त पायी चालतच पाहता येतं. डोंगररांगा दूर उभे राहून पाहणे यापेक्षा त्या डोंगररांगांमधून पायी फिरणे निश्चितच जास्त सुखावह असते हे मी स्वानुभवातून सांगू शकते. पदभ्रमणाच्या वाटेवरील निरव शांतता, शुद्ध हवा, पक्षांचे सुमधुर आवाज, पानांची सळसळ, हिरवाई मनाला मोहित करते. ज्याला हा छंद जडला तो फार काळ निसर्गापासून दूर राहूच शकत नाही. निसर्गाशी एकरूपता, स्वयंपूर्णता, साहस, जिद्द, बंधुभाव, प्रसंगावधान, तडजोड हे गुण हा छंद जोपासला तर वाढत जातात. ज्यावेळी भेदभाव विसरून सगळे एकाच वाटेने, एकाच परिस्थितीत, एकच लक्ष्य प्राप्त करण्यासाठी चालत असतात त्यावेळी माणसाचा माणसाशी खरा सूर जुळतो. हा छंद माणसाचा जगण्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलून टाकतो.

जंगलभ्रमण, गिरीभ्रमण, पर्वतारोहण असे अनेक भटकंतीचे प्रकार आहेत. आपल्या देशाला सह्याद्री, सातपुडा, हिमालय अश्या पर्वतरांगांची अमूल्य देणगी मिळाली आहे, तसेच अनेक अभायारण्यें, त्यातील वनस्पती, पशु-पक्षी यांच्या अभ्यासाच्या उद्देशाने अनेक लोकांची भटकंती सुरु असते. आव्हानांची कमतरता नसलेल्या या भटकंतीत माणसाच्या शारीरिक, मानसिक, व बौद्धिक क्षमतेचा पुरेपूर कस लागतो. जंगली हिरवाईचे लावण्य, सूर्यास्ताच्या रंगेबिरंगी छटा, रिमझिम बरसणाऱ्या सरी, अवखळ धबधबे हे निसर्गाचे मनोहारी रूपही पदभ्रमणात पाहायला मिळते, तसेच वादळवारा, धुवाधार पाउस, कडक ऊन, कठीण वाट हे निसर्गाचे रौद्र रूपही अनुभवता येते. निसर्गाशी एकरूपता साधणे ज्याला शक्य आहे त्यानेच जंगलात फिरावे. ज्याला शांततेत, पक्षांच्या आवाजात संगीत शोधता आले त्यानेच हा छंद जोपासावा. या सगळ्यातून जाणीवेने परिपूर्ण माणूस घडतो, अहंकार नाहीसा होतो व परस्पर सहकार्याची भावना रुजते हे मात्र नक्की. एकदा का हे वेड माणसाला लागले की डोंगर दऱ्यातील वाटा, उंच उंच कडे, दाट जंगल त्याला नेहमी साद घालत राहतात.

महाराष्ट्राला सातपुडा व सह्याद्रीच्या पर्वतरांगा गिर्यारोहणाची आवड पूर्ण करण्यासाठी मिळालेली अमूल्य देणगी आहे. या डोंगररांगा, खोल दऱ्या, कातळकडे, सुळके, घाट, अरण्ये त्यांच्या रूपाची मोहिनी घालून स्वतःकडे आकर्षित करतात. विशेषतः पावसाळा सुरु झाला की सुट्टीच्या दिवशी सिमेंटचे जंगल नकोसे वाटते, त्यामुळे भटक्यांचे पाय आपोआपच डोंगरांकडे वळतात. सह्याद्रीत तर किल्ल्यांमुळे गिर्यारोहणाला आगळेच महत्व प्राप्त झाले आहेत. ह्या सह्य कड्यांच्या मदतीने शिवरायांनी स्वराज्य स्थापनेचे अवघड कार्य सिद्धीस नेले. किल्ले फिरतांना त्याच्या संपूर्ण ऐतिहासिक माहितीसह फिरलात तर ऐतिहासिक पर्यटन घडेल व ह्या वास्तू म्हणजे आपल्या पूर्वजांची धारातीर्थे आहेत याची खात्री पटेल. हे दुर्गम दुर्ग पादाक्रांत करतांना आपल्या लक्षात येईल कि ह्या किल्ल्यांमुळे व त्यावरील बांधकामामुळे भटक्यांना क्षणभर विश्रांतीची सोय झाली आहे. सह्याद्री हा ज्वालामुखीतून तयार झाला आहे याची साक्ष सुळके, कठीण कडे सतत देतात. त्याचे रांगडे रूप थोडे भयावह वाटत असले तरी या कातळकड्यावरून फिरतांना मनात प्रचंड आत्मविश्वास निर्माण होतो. गिर्यारोहण करतांना पायात जोर व मनात निश्चय असणे अतिशय आवश्यक आहे.

अमरावतीच्या जवळ सातपुडा पर्वतरांगातील मेळघाट अभयारण्य म्हणजे विदर्भाचे नंदनवन. फेब्रुवारी ते मे पर्यंत विदर्भातील तापमान वाढलेलं असल्यामुळे पदभ्रमणासाठी योग्य वातावरण नसतं, त्यामुळे विदर्भात फक्त जुलै ते जानेवारी पर्यंत पदभ्रमण कार्यक्रमाचा आनंद घेऊ शकतो. आता जुलै आला आहे आणि पुन्हा एकदा वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेतर्फे या वर्षीही पावसाळी व हिवाळी पदभ्रमण मोहिमा आयोजीत केल्या जाणार आहेत.

चिखलदरा येथील गाविलगड किल्ला, अकोट जवळ असलेला नरनाळा किल्ला, कलालकुंड, धारखोरा, चीचाटी असे अनेक जंगलाच्या आतील धबधबे, सेमाडोह, कोलकाज, माखला, कुकरू येथील अनेक अंतर्गत मार्ग असे अनेक कार्यक्रम यावर्षी संस्थेतर्फे घेण्यात येतील. संस्थेच्या सर्व सभासदांना तसेच इतर पर्यावरणप्रेमी नागरिकांना या पदभ्रमण कार्यक्रमात सहभागी होता येईल.

संस्थेच्या अनेक पदभ्रमण मोहिमांमध्ये लेखकासोबत गाविलगड व नरनाळा हा ट्रेक विशेष असतो कारण या पदभ्रमण कार्यक्रमात सातपुड्यातील किल्ले या पुस्तकाचे लेखक व वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर हे संपूर्ण किल्ला त्याच्या ऐतिहासिक माहितीसह दाखवतात. किल्ल्यातील बांधकाम, त्यातील बारकावे त्यामुळे कळतात. तसेच कुठलाही किल्ला पाहतांना लक्षात ठेवाव्या अश्या गोष्टींची माहिती होते. किल्ल्यातील वास्तू म्हणजे उत्कृष्ट स्थापत्यकलेचे नमुने असतात, आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाने पावन झालेल्या या वास्तू म्हणजे आपली प्रेरणास्थाने होत. गाविलगड व नरनाळा किल्ल्याचा इतिहास देखील रोचक आहे. चिखलदरा पर्यटन कार्यक्रमात लोकं किल्ल्याचे पहिले दोन दारं पाहिले की किल्ला पाहिला असं समजतात पण आतपर्यंत चालत गेलात तर संपूर्ण किल्ला पहिल्याचे समाधान मिळते. धारखोरा धबधबा, चीचाटी व कलालकुंड धबधबा हे रस्तेही निसर्गसौंदर्याने नटलेले आहेत, पाण्यात भिजण्याचा आनंद घेता येतो पण अर्थात सुरक्षित ठिकाणी व काही सूचनांचे पालन करावे लागते. कोणाला कुठलीही इजा होऊ नये या शुद्ध हेतूने या सूचना दिल्या असतात, त्यामुळे स्वसुरक्षेसाठी त्यांचे पालन करणे हिताचे असते. आयोजकांशी सहकार्याने वागले तर पदभ्रमण नक्कीच यशस्वी व आनंददायी होतं. मेळघाट परिसरात असे अनेक मार्ग आपल्या प्रतीक्षेत आहेत ज्यावरील निसर्ग तुम्हाला नक्कीच मोहित करेल.

पदभ्रमण करतांना सर्व सूचनांचे काटेकोर पालन करणे, अतिसाहस न करणे या गोष्टी आपल्याच फायद्याच्या असतात. अनेक अपघात हे केवळ निष्काळजीपणा व अतिसाहस यामुळे घडतात याचे सर्व जाणत्या लोकांना भान असते. संपूर्ण काळजी घेतल्यावरही समजा आपत्ती आली तर परिस्थिती योग्य प्रकारे हाताळणे व अनुभवी माणसाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असते. आलेल्या परिस्थितीचा सामना सगळ्यांना एकत्रित येऊन करण्याची मनस्थिती तयार करूनच अश्या कार्यक्रमात सहभागी होणे अपेक्षित असते. स्वतःचे आवश्यक सामान घेऊन, बूट घालूनच पदभ्रमण करावे. पाण्याचा वापर जपून करावा. सध्या सेल्फी घेण्याच्या नादात अनेक अपघात घडतात तेव्हा फोटो काढा पण स्वतःला सांभाळा. निसर्गाला हानिकारक होईल अशी कृती अपेक्षित नाही. कचरा, प्लास्टिक जंगलात टाकू नका, दिसलेच तर उचलून आणा व त्याची योग्य विल्हेवाट लावा. पावसाळी ट्रेक करतांना काही बिया जमा केल्या असतील तर त्या रुजतील अश्या ठिकाणी टाकून निसर्गाला मदत करा. काही ठिकाणी उजाड टेकड्यांवर वृक्षारोपण करू शकतो. स्थानिक लोकांशी संवाद साधा. गावातून एखादा वाटाड्या सोबत असणे आवश्यक आहे कारण जंगलातील रस्त्यांची त्यांना संपूर्ण माहिती असते. या काही लहान लहान वाटणाऱ्या पण महत्वाच्या बाबी लेखात मुद्दामच नमूद केल्या आहेत. पदभ्रमण करण्यासाठी आपण उत्साहात असतो. हा उत्साह शेवट पर्यंत टिकावा व सुखद आठवणींचा ठेवा घेऊन परतीचा प्रवास व्हावा यासाठी ह्या सूचना पाळणे अत्यावश्यक आहे.

वेक्स (WECS) गेल्या अनेक वर्षापासून वन्यजीव व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात प्रशंसनीय कार्य करते आहे. भौतिक सुखाच्या लालसेने मानवाकडून आधीच पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी झाली. त्यामुळे जगासमोर मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. संस्था वेगवेगळ्या उपक्रमातून समाजात निसर्ग संवर्धनाचे महत्व सांगून जागृती निर्माण करण्याचे कार्यही सातत्याने करते आहे. या पदभ्रमण मोहिमेतून निसर्गाबद्दल प्रेम व आस्था असणारी पर्यावरणप्रेमी पिढी निर्माण व्हावी असे संस्थेला वाटते म्हणून हे कार्यक्रम  ना नफा ना तोटा या तत्वावर घेतले जातात. निसर्गाचे महत्व प्रत्येक व्यक्तीला कळावे आणि आजच्या स्पर्धेच्या युगात कुठेतरी क्षणभर शांतता अनुभवता यावी हा पदभ्रमण मोहिमांचा मुख्य उद्देश आहे. चालणे हा सर्वांगसुंदर व्यायाम आहे आणि म्हणूनच पदभ्रमण हा सर्वांसाठीच सर्वांगसुंदर छंद ठरेल यात काही शंका नाही.

*****

# दुर्लक्षीतांचे धनी...



**किरण मोरे**
कार्यकारिणी सदस्य, वेक्स
kiranmorey1983@gmail.com

अलीकडेच मराठा समाज आरक्षण हा मुद्दा खूप गाजला. मराठा समाज व त्यातील जाती मोठ्या प्रमाणात असूनसुध्द्धा त्याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, बहुसंख्य मराठा समाज शेतीवर अवलंबून असूनही सरकारची शेतीबद्दलची असणारी अनास्था यामुळे मराठा समाजातील दुर्लक्षीत जातींना वाचवायचे असेल तर त्यांना आरक्षण मिळायलाच हवे या मागण्यासाठी चर्चा झाल्या,सभा रंगल्या,ठीकठीकाणी मोर्चेनिघाले. त्याचे राजकारण झाले असो वा नसो पण मराठा समाजातील सर्व जाती काळाच्या मुख्य प्रवाहात टिकून राहण्यासाठी एकत्र आल्या. दुर्दव्याने पक्षांच्या जगात असे घडू नाही शकत. त्यांना स्वतः ला वाचवण्यासाठी असे एकत्र येणे जमणार नाही.पक्षीजगात मोठे वा आकर्षक पक्षीच आपले लक्ष वेधून घेतात त्यांच्या अधीवासावर होण्याऱ्या आक्रमणामुळे त्यांच्यातील लुप्त होण्याऱ्या प्रजातींनाच काही पक्षीप्रेमी व पर्यावरणामध्ये कार्यरत संस्थाच्या प्रयत्नामुळेच शासनाचा राजाश्रय मिळतो. पण छोटे,अनाकर्षक पक्षी किंबहुना सगळीकडे आढळणारे पक्षी दुर्लक्षीतच राहतात पर्यायाने त्यांचा धोक्यात येणारा अधीवास सुद्धा विरळ होत जातो त्यात चंडोल(अलाउडीडी)(लार्क)कुळातील पक्षांचा कदाचीत प्रथम क्रमांक लागेल. त्यांच्याकडे लक्ष न जाण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा छोटा आकार,भुरकट मातकट रंग हा आहे. पण त्यांच्या काही लकबी, विणीच्या हंगामातील करामती लक्षात घेतल्या तर आपण त्यांना सहज ओळखू शकू.

सर्वात प्रथम मोठ्या प्रमाणात आढळणारा चीमण चंडोल(Ashy crown sparow lark) बद्दल जाणून घेऊया.हा बसकट आकाराचा चीमणीपेक्षा लहान असतो. मादीचा रंग सरसकट वाळूसारखा तपकिरी तर नर खालून पूर्णपणे काळा. रंगाने पुर्णपणे जमिनीशी समरस असल्याने ते सहसा दिसून येत नाही पण विणीच्या हंगामात मादिसाठी गाणे म्हणत हवेतील करामती दाखवीताना हा सहज ओळखू येतो.हवेत २५ मीटरपेक्षा उंच एखाद्या रॉकेट सारखा वर जातो व पंख मिटून खाली सुर मारतो.जमीनीजवळ आल्यावर परत आपल्या वेगाचा फायदा घेऊन तो परत उलटा थेट वर जातो तेथून पुन्हा सुर मारतो.प्रत्येक सुर मारण्याच्या वेळी आपल्या छोट्या लकेऱ्या लांब स्वरामध्ये सी ई ई ई.. ई. ई.असे गाणे गातो. उघड्या माळरानावर,नापीक प्रदेशात हा जोडीने दिसून येतो. तुरेबाज चंडोल(Sykes lark)मात्र ६-७ च्या समूहाने दिसतो.आकाराने चीमणीएवढा. भुरकट,मातकट रंगाचा हा पक्षी आपला डोक्यावरचा तुरा डौलाने मिरवतो. त्याच्या आजूबाजूच्या सर्व पक्षांची नक्कल हा हुबेहूब करू शकतो. प्रजनन काळात(जुलै ते सप्टेंबर)आकाशात १०० मीटरपेक्षा वर जाऊन पंखाची अखंड उघडझाप करत सलग १० ते २० मीनीट गाणे गाण्याची कला या जातीत आहे. तर लालपंखी चंडोल(Indian bushlark)आपल्या विमान स्टाईल साठी प्रसीध्द आहे. प्रजनन काळात गाण्याच्या स्वरातील चढ-उतार करीत हा आकाशातून खाली उतरताना पंख विस्तारून अगदी स्थीर ठेवून विमानासारखा जमीनीवर उतरतो.आकाराने चीमनीएवढाच,डोक्यावर छातीवर काळे ठिपके व पंखावरील लाल भागाने हा ओळखू येतो.छोट्या बुंध्यावर,तारेवर बसून याचे मादीसाठी अखंड गायन चालू असते.

चंडोल कुळामध्ये गवई चंडोल(Singing bushlark)हा गायनासाठी प्रसीद्ध आहे. तसा तो नावाने सर्वांना परीचीत आहे पण तितकाच दुर्मिळ सुद्धा आहे. असतो तो लालपंखी चंडोल सारखाच पण डोक्यावर,छातीवर काळे ठीपके नसतात.बुंध्यावर बसून किंवा आकाशात विहार करतांना याचे मादिसाठी मधुर गायन चालू असते. त्याचे गाणे कधी तुटकपणे तर कधी मंजुळ शीळ वाजवल्यासारखे वाटते. वीणीच्या हंगामात प्रामुख्याने जून ते सप्टेंबर मध्येच याची हजेरी जाणवते बाकी वर्षभर तो भूमीगत असल्यागत गायब असतो.

चंडोल कुळातील सर्वात वेगळा पक्षी म्हणून गोरली चंडोल(Rufous tailed lark) ओळखला जातो.चीमनीपेक्षा मोठा,गडद तांबूस रंगाचा व जाड चोचीचा हा चंडोल सहसा दगडी माळरानावर दिसून येतो. जमीनीवर हा कधी ईकडे तर कधी तीकडे असा झीग-झॅग स्टाईलने खाद्य टिपताना दिसून येतो.गोरली चंडोल चे गाणे अगदी आनंददायी असते ते प्रश्नोत्तराच्या स्वरुपात गायले जाते एका माथ्यावर नर बसून गातो तर दुसऱ्या माथ्यावरुन मादी त्याला प्रतीसाद देते. हे झाले स्थानीक रहिवासी या कुळातील काही परदेशी पाहुणे सुध्दा विदर्भात हिवाळी पाहूणचारासाठी अफगानीस्तान,बलूचीस्तान येथून येतात. आखूड बोटाचा चंडोल(Grcoter short toed lark) ची नोव्हेंबर ते मार्च महिन्यात सर्वच तलावाच्या काठी हजेरी दिसून येते.हुबेहूब चिमणीसारख्या दिसण्याऱ्या या जातीचा थवा १० पासून ४०० पर्यन्तच्या संख्येत आढळून आला आहे. तळ्याच्या काठी बारीक आवाजाचा चिवचिवाट करत गवत्यातल्या बिया टिपताना या नेहमीच दिसून पडतात एखाद्या वर्षी त्यांच्या थव्यामध्ये ह्युम्स चा चंडोल(Humes)हा परदेशी पाहुणा सुद्धा आपली हजेरी लावून जातो. अशा या चंडोल कुळातील विविध जाती आपल्या आजुबाजुने वावरत असूनही दुर्लक्षीत राहतात.त्यांची ओळख पटवून संपूर्ण शास्त्रीय अभ्यास करणे गरजेचे आहे त्यावरून त्यांना भेडसावण्याऱ्या प्रश्नाची आपल्याला कल्पना येवू शकेल.

माळरान,मोकळे मैदान,नापीक प्रदेश हे चंडोल जातीचे घरट्यासाठी व उदरभरणासाठी हक्काचे अधिवास पण निरुपयोगी जमीन अशा सरकारी नामकरणाखाली झालेल्या शोषणाने माळरानाचे तीन तेरा केले आहे.अनिर्बंध कारखानदारी त्यापाठी आलेले शहरीकरण,विकास योजना यासाठी जमीनीची गरज भासू लागली व त्यासाठी माळरान,नापीक जमीनला लक्ष करण्यात आले.परिणामी मोठ्या प्रमाणात शहराभोवतालची माळराने संपून तिथे सीमेंटचे जंगल व कारखाने उभे राहीले.ज्या पक्षांच्या जाती आपल्या घराच्या आजुबाजुने दिसायच्या त्यांना पाहण्यासाठी १५ -२० किलोमीटरवर दूर जावे लागते याचा अर्थ काय तर मोठ्या प्रमाणात दिसण्याऱ्या जाती आता विरळ होत चालल्या आहे.त्यात चंडोल सारख्या छोट्या व अनाकर्षक पक्ष्यांची तर गोष्टच नीराळी. याला जबाबदार केवळ राजकीय अनास्थाच नाही तर आपण सुद्धा आहोत. मानवी समाजासोबत पक्ष्यांनापण आरक्षण मिळायलाच हवे. त्यासाठी औद्योगीकरण,राजकारण,विविध विकास व आपली जीवनशैली पर्यावरणपूरक करणे गरजेचे झाले आहे.



*****

# चला करूया गणना सर्वसामान्य पक्ष्यांची...



**नंदकिशोर दुधे**
मुंबई
मो. ८७८८५२३७५६

भारत उपमहाद्वीपामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये किती प्रकारचे पक्षी आढळतात ?

भारत उपमहाद्वीपामध्ये साधारपण पणे १३०० पेक्षा जास्त पक्षांची नोंद झालेले असून महाराष्ट्रामध्ये ५५० पेक्षा जास्त पक्षी आढळून येतात. त्यामध्ये कबुतर, मैना, कावळा, चिमणी, घार साररव्या पक्षांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून, ती काही शहरांमध्ये खूप अधिक संख्येने आहे तर काही शहरांमध्ये खूप कमी संखेने आढळून येते. जर या पक्ष्यांची शास्त्रीय पद्धतीने गणना (नोंद) करण्यात आली तर आपल्याला कळेल कि आपल्या परिसरातकुठल्या प्रजातीचे पक्षी आढळतात, त्यासोबतच त्यांच्या संवर्धनाबाबत उपाययोजना करता येईल.

❋ सर्वसामान्यपणे आपल्या परिसरात किती प्रजातीचे पक्षी आढळतात ?

सर्वसामान्यपणे आपल्या परिसरात म्हणजे परसबागेत, बाल्कनीत, १० ते १५ प्रजातीचे पक्षी आढळतात त्यामध्ये प्रामुख्याने चिणमी, कावळा (House Crow), डोमकावळा (Indian Jungle Crow), कबुतर, बुलबुल शिपाईबुलबुल(Red-whiskered Bulbul),लालबुड्याबुलबुल(Red-vented Bulbul), मैना साळुंकी (Common Myna), जंगलीमैना (Jungle Myna),कवडीमैना (Asian Pied Starling), भांगपाडी मैना (Brahminy Starling) घार, छोटा तपकिरी होला (भवरी), पोपट (करणपोपट(-lexandrine Parakeet),कंठवाला पोपट(Rose-ringed Parakeet),कोकीळ (Asian Koel), शिक्रा,जांभळा सूर्यपक्षी, तांबट (Coppersmith Barbet- Mumbai city bird ).

❋ पक्षांची निसर्ग संवर्धनासाठी महत्त्वाची भूमिका ?

या मधले बरेचशे पक्षी सर्वसामान्य लोकांना ओळखता येतात. पक्ष्यांचा निसर्गाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका आहे. १) फळांच्या बिया पसरवीण्याचे काम पक्षी करतात २) पिकांवरील कीटक संपविण्याचे काम पक्षी करतात ३) निसर्गाची सुंदरता वाढविण्याचे काम पक्षी करतात ४)मेलेल्या प्राण्याना खाऊन निसर्गाची स्वच्छता ठेवण्याचे काम पक्षी करतात ५) उंदराची संख्या नियंत्रणात ठेवण्याचे अति महत्त्वाचे काम घुबड प्रजातीचे पक्षी करतात.

❋ पक्षांची संख्या कमी होण्या मागे नेमके कारण कुठले ?

वाढती लोकसंख्या, शहरीकरण, वाढते औदोगीकरण, एकंदरीत पर्यावरणाचा होणारा ऱ्हास पक्षांच्या जीवनावर विपरीत परिणाम करतात. चिमणी हा पक्षी सर्वाना परिचयाचा आहे, पण आपला हा शेजारी आज आपल्या पासून दूर जात आहे, त्याचे मुख्य कारण म्हणजे माणसाने हिरावून घेतलेला अन्न आणि निवारा, निसर्गाला लक्षात न घेता केलेली प्रगती असे एक ना अनेक कारणे त्यामागे जुळलेली आहे. पूर्वीच्या काळी मातीची घरे असायची त्या घरांना कोनाडे असायची, ते कोनाडे म्हणजे चिमण्यांची घरटी सोबतच घरांच्या अंगणात विहिरीत असायची, विहरीत असलेल्या लहान लहान छिद्रांमध्ये सुद्धा चिमण्या आणि इतर पक्षी घरटी करायचे. पण आता घरांची जागा उंच उंच इमारतीने घेतलेली आहे तसेच विहारीच्या जागी आता बोअरवेल ( कुपनलिका ) आली , त्यामुळे पक्षांच्या अधिवास हिरावून घेतला आहे असे म्हटले तरी चालेल.

दूर जात असलेल्या आपल्या शेजाऱ्यांना जवळ आणायचे असेल तर आपल्या काही उपाययोजना करावी लागेल, त्यामध्ये त्यांच्या ज्या मुलभूत गरजा आहे ते त्यांना पुरुवाव्या लागतील.

❋ पक्ष्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास कसा करायचा ?

आधी आपल्याला पक्ष्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करावा लागेल, तो कसा करायचा तो मी आधी तुम्हाला सांगतो. पक्षांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून बॉंबे नॅचरल हिस्ट्री

सोसायटी (बीएनएचएस) ने संपूर्ण भारतामध्ये Common Bird Monitoring Programme सुरु केलेला आहे. यासाठी भारतातील जास्तीत जास्त संस्थेच्या मदतीने CBMP संपूर्ण भारतामध्ये राबवणार आहे. महाराष्ट्रामध्ये या कार्यक्रमाच्या माध्यमातून पक्ष्यांचा नकाशा ( Bird Atlas) तयार कारायचा आहे.त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील पक्षीमित्राची मदत घेतली जाणार आहे. यावरून आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पक्ष्यांचा विस्तार लक्षात येईल तसेच त्यांचा संख्येचा अंदाज घेता येईल त्या सोबतच संवर्धनासाठी उपाययोजना करता येईल. जेणेकरून आपल्या परिसरात पक्षाची संख्या वाढवायला मदत होईल.

सर्वेक्षण हे वर्षातून तीन वेळेस करायचे असून जी. आय. एस. सॉफटवेयर च्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर ग्रीड टाकण्यात आलेले असून प्रत्येक ग्रीड २ते२ किमी चा असून, ट्रॅन्झ्याक्ट लाइन ही प्रणाली वापरून हा अभ्यास केला जाणार आहे. वर्षानुवर्षे साधारण ४ ते ५ वर्ष सतत सर्वेक्षण केल्यानंतर आपल्या लक्षांत येईल कि कुठल्या प्रजातीचे पक्षी आपल्या कडे जास्त आहे किवा कमी आहे. त्यासोबतच त्यांच्या संवर्धनासाठी सुद्धा उपाय योजना करण्यात येईल.

* पक्षांची संवर्धनासाठी उपाययोजना काय करायला हवी ? उन्हाळ्यात कुठली काळजी घायला हवी ?


सध्या उन्हाळा जोरावर आहे आणि सगळीकडे पाण्याची कमतरता जाणवत आहे. जो त्रास मानव सहन करत आहे त्यामधून पक्षी प्राणी सुद्धा सुटलेले नाही. आपल्या परिसरात आढळणाऱ्या पक्षांच्या संवर्धनासाठी आपण काय करू शकतो ते आपण पाहूया...

१) कृत्रिम घरटी उपलब्ध करून देणे :- पक्षी आपल्या परिसरातून दूर जाण्याचे मुख्य कारण घरटी करायला जागेची कमतरता. जर आपण कृत्रिम घरटी उपलब्ध करून दिली तर ते आपल्या परिसरात पुन्हा बागडायला लागतील. कृत्रिम घरटी तयार करणे अगदी सोपे आहे, जर तयार असलेली घरटी हवी असेल तर सामाजिक संस्था जवळ मिळतील. बॉंबे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) पासून सुद्धा तुम्ही ती विकत घेऊन शकता.

२) पाणी उपलब्ध करून देणे :- बाल्कनी किवा गार्डन मध्ये स्वच्छ उथळ पाण्याचे भांडे भरून ठेवले तर पाण्याचा प्रश्न सुद्धा सुटेल.

*****





# रात्रीचे पक्षीजगत...



**शिशिर शेंडोकार**
सदस्य वेक्स, अकोला
मो.नं.८८३०३८८७२९

पक्षी निरिक्षण करावयाची योग्य वेळ म्हणजे सकाळी किंवा दुपारी ३ नंतर. त्यात हिवाळयामध्ये पाहुणे पक्षांचे निरिक्षण करायला सकाळी-सकाळी कडाक्याच्या थंडीत, गर्द धुक्यात, तलावावर किंवा जंगलात पक्षांच्या नोंदी घेण्यात वेगळीच मजा असते, त्यात नवीन पक्षी आढळल्यास पर्वणी होते. पण सर्वसाधारण ह्या सर्व गोष्टी आपण सकाळी किंवा संध्याकाळीच करतो. पक्षांबरोबर जंगलाचा व बाकी सजीवांच्या हालचालीकडे आपण फारसे लक्ष देत नाही व या सर्वांपेक्षा वेगळं कधी रात्रीच्या वेळी पक्षी निरिक्षण करण्याचा विचार आपण केला आहे काय? आपल्या शेतात, माळरानात, घराच्या गॅलरीतून किंवा शक्य झाल्यास जंगलात जावून हा अनुभव बहुतेक लोकांनी घेतला नसेल किंवा तशी वेळ असल्यास या गोष्टी सूचल्या नसतील. कारण आपण सकाळी किंवा संध्याकाळीच पक्षी निरिक्षण करतो. रात्रीचे पक्षी निरिक्षण किंवा सजीवांच्या हालचाली पाहणे सर्वांना शक्यही नाही. आणि दुसरं म्हणजे हे करणंही धोकादायकही असू शकते. पण सावधगिरीने व समूहाने योग्य् त्या वस्तू घेऊन केल्यास सहजच शक्य होते. आपल्यासाठी रात्रीचे पक्षी निरिक्षण व त्यांची दुनिया ही रहस्यमयच असते. शिवाय रात्रीचे पक्षी म्हटले की, आपल्याला घुबड आठवते. घुबडला इंग्रजीमध्ये 'आऊल' म्हणतात. घुबडाविषयी आपल्या मनात व घरातही काही जुन्या दंतकथांमुळे शुभ किंवा चांगले मानल्या जात नाही. त्याबद्दल भिती असते. आपल्या घराच्या आजूबाजूला रात्री सहजच दिसणार घुबड म्हणजे ठिपकेवाला घुबड. (स्पॉटेड ऑऊलेट) आपल्या भाषेत मटमट्या नावानेही ओळखतात. ते विजेच्या तारेवर किंवा झाडावर बसून 'खाचीड-खिचीड' असा कर्कश आवाज करून लाईटासमोर येणारे पतंग, किडे किंवा उंदरांचा फडशा पाडताना मी माझ्या गॅलरीतून नेहमी पाहत असतो. तसेच कधीकधी 'हुमा घुबडा'चा आवाज ऐकायला येतो. दूर एखाद्या खांबाच्या टोकाला मोठी अशी आकृती, मोठे गोल डोळे लाल चमकताना दिसतात. तर कधी पांढरा रंगाचा 'बार्न आऊल' अचानक डोक्यावरून उडत जातो. झाडांमधून शुऽशुऽऽऽ असा आवाज ऐकायला येतो. हे तीन घुबड आपल्याला थोड्या मेहनतीने व सातत्याने लक्ष दिल्यास घराच्या गॅलरीतून किंवा कॉलनीचा फेरफटका मारताना सहजच दिसू शकतात. एकदा दिसले की ते नेहमी तेवढ्यातच दिसतील. कारण घुबड सहसा आपली जागा बदल नाही. याशिवाय बाकी घुबडाच्या प्रजाती घराच्या आजूबाजूला दिसणं कठीणच. ते पाहायचे असल्यास जंगलात जावे लागले. पण जंगलाचे नियम वेगळे असतात व सर्वांना शक्यही नाही. पण माझ्या बाबतीत तसं नाही. माझे वडील वन खात्यात असल्यामुळे माझं बालपण जंगलातच घुबडांच्या व रातवांच्या आवाज ऐकण्यात गेलं. तेव्हा मला आणखी एका पक्षाच्या आवाजाचा मोह आवरेना, ते म्हणजे 'रातवा'. जंगलातून सारखा येणारा आवाज. तेव्हा मनात घर करून बसला. पण त्याला पाहण्याची संधी कधी मिळाली नाही. पण आता वेक्स (वाईल्ड लाईफ अँड इन्व्हारमेंट कन्झरवेशन सोसायटी, अमरावती) सोबत फॉरेस्ट आऊलेट व आऊल्स अँड आऊलेट या विषयावर काम करताना कळले की रातवा हे नाव खरच किती समर्पक आहे रातवा नावच एक जादुई रहस्यमयी वाटते. रातव्याला इंग्रजीमध्ये 'नाईट जार' म्हणतात व आपल्या भागामध्ये याच्या तीन प्रजाती आढळतात. रान रातवा, सामान्य रातवा,फ्रँकलीनचा किंवा सवाना रातवा. या प्रजातींना दिवसा शोधणे कठीणच आहे. विशेष म्हणजे याची गोपानियता कमालीची असते. निसर्गाने त्याचे पंख, त्याचा रंग शरिराची रचना एकदम आजूबाजूच्या वातावरणाशी मिळती जुळती केल्याने शोधणे अवघडच. पण रात्री त्यांच्या आवाजावरून त्यांची दिशा समजते. रातव्याचा आवाज एकदम

कडक, जवळ जवळ आपल्या शरीराच्या आरपार गेल्यासारखा वाटतो व त्याचे तरंग जाणवतात. रानरातव्याचा आवाज चक्रू..चक्रू..चक्रू किंवा चूक....चूक....चूक....चुकुर्र असा रात्रभर येतो. हा आवाज संपूर्ण जंगल जीवंत आसल्याचे सांगतो, पण आवाज नेमक्या कोणत्या दिशेने येतो हे सांगणे कठिण होऊन जाते. जेव्हा चारही बाजूने सारखा आवाज एकमेकांना साद घालत असतो. तसेच सवाना किंवा फ्रँकलींनचा रातवा व सामान्य रातवा दिसायला जवळजवळ थोड्याअधिक फरकाने सारखेच असतात. यांनाही त्यांच्या आवाजवरून ओळखता येते व वेगळे करता येते. सवाना रातव्याचा आवाज क्विच..क्विच..क्विच.. असा असतो. तर सामान्य रातव्याचा आवाज सारखा फिक्कम...फिक्कम... असा येतो. हे आवाज आपले लक्ष वेधून घेतात. फिरता फिरता अचानक डोक्यावरुन उडल्याचा भास होतो. तसा रातव्यांच्या पंखाचा उडताना आवाज येत नाही.त्यांचे पंख निमुळते, लांब, टोकदार असतात व लांबीला शरीराच्या दुप्पट वाटतात. अशा विशेष रचनेमुळे आवाज येत नाही. पण मिलंनाच्या आधी मादिला आकर्षित करण्यासाठी जी कसरत चालते तेव्हा मात्र तो पंखाचा फड्फड आवाज करत प्रदर्शन करतो व हवेमध्ये सूर मारून कलाबाजी दाखवत आपल्या पंखाच्या रचनेचा पूर्ण फायदा घेताना दिसतो. सुरवातीला आवाजाच्या दिशेने टॉर्चच्या प्रकाश झोतात झाडांवर निरीक्षण करताना अचानक मोठे गोल डोळे, लाल, हिरवे, पिवळे चमकताना दिसतात. दूर ते एखाद्या रानमांजरासारखे वाटतात. जवळ जाताच छोटया फांदीवर असल्यामुळे पटकन लक्षात येते की रातवाच आहे. त्यात रातव्याची बसण्याची तऱ्हा वेगळीच. जमीनीवर असताना एकदम छाती जमीनीला चिटकून बसने व झाडाच्या फांदीवर असताना त्या फांदीच्या समांतर बसणे व दुसरे विशेष म्हणजे रातव्याला मिशा किंवा चोचीच्या शेवटच्या भागात काळे तंतु असतात. त्याला 'ब्रिसल्स' असे म्हणतात. ते काही ठराविक पक्ष्यांमध्ये पहायला मिळतात. हे ब्रिसल रात्रीच्या अंधारात भक्ष्यच्या हालचालीमुळे निघणारे आवाजाचे तरंग पकडण्याचे काम करतो. व भक्ष्याचा अचूक पता लागतो. रातवा आपल्याला रात्रीच्या वेळेस फिरताना झाडाच्या टोकाला, दगडावर किंवा डांबरी रस्त्यावर शांत बसलेला दिसतो. पण त्याच्या याच सवयीमुळे ते रस्त्यावर अपघात होऊन मृत पावलेले सापडतात. तसेच रोड किलमध्ये आणखी बऱ्याच पक्ष्यांची नावे येतात. जसे रात्रीच्या पक्ष्यांमध्ये स्पॉटेड आऊलेट. पण रस्त्यावर समांतर झालेला दिसतो. कारण अचानक गाडीचा लाईट त्याच्या डोळ्यावर पडल्यामुळे ते गोंधळून जातात व त्यामुळे समोरचे काहीच दिसत नाही. परिणामी वाहनाची धडक लागून ते मरण पावतात. यावर उपाय म्हणजे आपणच वाहनाचा वेग नियंत्रित ठेवून या सुंदर पक्षाचा जीव वाचवू शकतो व निसर्गाचा समतोल राखण्यास मदत करू शकतो. निसर्गाच्या समतोलासाठी दिवसा जसे पक्षी महत्वाचे आहेत, तेवढेच रात्रीचे पक्षी सुद्धा आहेत. रात्रीच्या पक्षाच्या यादीमध्ये घुबड प्रजातीमधील स्पॉटेड आउलेट, बार्न आऊल व इंडियन ईगल आऊल सोडून आणखी ९ प्रजातीचा आपण अभ्यास करू शकतो. शिवाय नाइट हेरॉन या पाण पक्षाला आपण रात्रीच बघू शकतो व प.घाटात आढळणारा श्रीलंकन फ्रॉगमाऊथ हा पक्षी पण जसा दुसऱ्या ग्रहावरून आल्या सारखा वाटतो. या पक्षाची रंगसंगती, आकार कमालीचा हुबेहूब आजूबाजूच्या वातावरणाशी मिळताजुळता असतो. या सर्व पक्षांचे निरीक्षण करताना आजूबाजूच्या जंगलावर नजर फिरवल्यास सजीवांच्या हालचाली दिसतात. त्यांचे निरीक्षण करण्यात वेळ कधी निघून जातो हे कळतच नाही. पण या सर्व गोष्टीचा आनंद घेण्यासाठी व निसर्ग चक्र सुरळीत चालण्यासाठी आपल्यालाच आपल्या सवयी बादलायला पाहिजे व जंगल वाचवायला पाहिजे. कारण जंगल नष्ट होईल तर पक्षी, प्राणी, कीटक नष्ट होतील व त्यामुळे मानव जातीला नष्ट होण्यास वेळ लागणार नाही.

*****

# बिबट : पहिला थरार...



**प्रशांत तिरमारे**
सदस्य, वेक्स, अमरावती.
मो.नं. ९४२१७७५२४१

प्रशांत तिरमारे, संस्थेचे एक नवोदित पण जिज्ञासू पक्षी निरीक्षक, वेळ मिळेल तसा निसर्गाच्या सानिध्यात जाणारा तरुण निसर्गप्रेमी. स्वत:चा अनुभव पहिल्यांदाच शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न प्रशांत ने केलाय, नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी या लेखास रानवेध मध्ये स्थान दिले आहे, यातून प्रेरणा घेऊन प्रशांतने पुढे लिहित राहावे, आपणास आवडेल अशी अपेक्षा.

.... संपादक

पक्षी म्हटलं तर कोणाला नाही आवडणार. असे फार थोडेच असतील किंबहुना कुणीच नसेल ज्यांना पक्षी आवडत नाहीत. मला पक्षी आणि प्राणी बद्दल लहानपणा पासूनच कुतूहल होते म्हणूनच त्यांचे निरीक्षण करणे मला खूप आवडते बरेचदा पक्षी निरीक्षण करता करता अनपेक्षित काही घडत असते मागील वर्षी उन्हाळ्यात मे महिन्यातील ही गोष्ट जेव्हा मी माझ्या आयुष्यातला पहिला बिबट बघितला होता. कड्याक्याच्या उन्हाळ्यात सुध्दा मी नेहमी प्रमाणे जसा वेळ मिळेल तसा पक्षी निरीक्षणाला जायचो.

सुट्टी चे दिवस होते, ऐरवी मी एकटा जाणारा; त्या वेळेस माझ्या बरोबर माझा एक मित्र होता. त्याला सुट्टी असल्यामुळे तो सुद्धा माझ्या बरोबर पक्षी निरीक्षणाला येणार होता निघतांना सहज म्हणून त्याने मला प्रश्न केला; आपण फक्त पक्षी बघणार! प्राणी नाही दिसणार का? मी त्याला म्हणालो पक्षी बघता बघता प्राणी पण दिसतात पण फार काही दिसेलच अशी अपेक्षा करू नकोस फक्त निसर्गाचा आनंद घ्यायला ये, त्याने पण हो म्हणत सहमति दर्शवली. आमचा जाण्याची वेळ ठरली पहाटे ५ ला, तलाव थोडा लांब असल्या मुळे थोड लवकर निघायच होतं. निघालो ठरल्या प्रमाणेच पण वेळेवर विचार बदलला आणि आम्ही आमची गाडी तलावा ऐवजी थेट पोहरा मालखेड जंगला कडे वळवली.

दिवस उजाडे पर्यंत आम्ही जंगलात पोहोचलो. उन्हाळ्याचे दिवस होते तरी सुद्धा जंगलात थोडी थंडी जाणवत होती. सगळीकडे पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होता, मोरांचा म्याऊ.... म्याऊ.... आवाज येत होता. मधेच झुडपात सात भाई क्वाय.. क्वाय.. करीत उडून जात होते. सुतार पक्ष्याची ठोक पिट एकीकडे सुरू झाली होती, कोकीळ चे छान गाणे गाण सुरू होतं, टिकेलचा निळा कस्तुरा इकडून तिकडे उडत त्याचे भक्ष पकडत होता. वातावरण खूप छान होत, जंगलात जाताना मधेच कुठे लांडोर पळून जाताना दिसत होते. आणि मी नेहमी प्रमाणे पक्ष्याच्या नोंदी घेत होतो. जवळ जवळ सगळ्याच सामान्य पक्ष्याच्या मी नोंदी घेत होतो. आम्ही जंगलात हळू हळू सावधगिरीने पुढे जात होतो. मधेच एका झाडावर हरियल चा थवा बसून होतां, जवळ जवळ ८-१० पक्षी होते मी त्याची नोंद घेतली आणि पुढे निघालो. थोडा पुढे जाताच आम्हाला एक पाणवठा लागला, तसा तो आटलेलाच होता परंतु त्यात थोड पाणी शिल्लक होत कदाचित ते वन विभागा कडून टँकरने पुरवत असतील. त्याठिकाणी एक ७-८ हरीणाचां कळप पाणी प्यायला आलेला होता, त्यांना आमची चाहूल लागताच ते बाजूला असलेल्या डोंगराच्या दिशेने पळालेत आणि काही दूर जाऊन परत आम्हाला बघू लागलेत, त्यांना बघून आम्ही काही वेळ झाडामागे दडून बसलो, कदाचित ते परत पाणी प्यायला येतील असे वाटत होत, खूप वेळ वाट बघून सुद्धा ते आलेत नाही, त्यांना आमचे अस्तित्व कळून चुकले होते. आम्ही परत पुढे जायचे ठरवले; पुढे एक तलाव आहे त्याचे पाणी नक्कीच आटले हे माहिती असून सुद्धा तिथे प्राण्यांच्या छान हालचाली असतात म्हणून आम्ही पुढे निघालो. आम्ही आता तलावा जवळ होतो, तलाव पूर्णतः आटलेला होता, मी एक नजर सभोवताल टाकली; मला काही पाऊल खुणा दिसल्यात; एरवी दिसणाऱ्या कुत्रा किंवा मांजर च्या पाऊल खुणांपेक्षा त्या मोठयाच होत्या, कारण त्या एका बिबटच्या होत्या.

मी लगेच पेन काढून त्या पाऊल खुनाच्या बाजूला ठेऊन त्याचे काही फोटो काढून घेतलेत एक नोंद म्हणून, आणि मग त्या पाऊल खुणा कुठल्या दिशेने आल्यात व कुठल्या दिशेने गेल्यात त्याचा शोध घेणे

सुरू केलं. त्या आमच्या पुढून आल्यात होत्या व आम्ही ज्या दिशे कडून आलो होतो तिकडे एका झुडपात नाहीस्या झाल्या होत्या, कदाचित त्या एक दिवसा पूर्वीच्या असाव्यात. असा मी कयास लावला. आता ७.३० वाजलेत होते आणि आम्हाला बाहेर निघायला आणखी १ तास लागणार होता, आणि उन्हामुळे थोड लवकर निघायचं पण होत. आम्ही आता परत एकदा त्याच पाणवठ्या जवळ आलो आणि तिथे थोड थांबलो, माझा मित्र माझ्या कॅमेरा मधले फोटो बघत होता, मी त्याला रस्त्याचा एका कडेला ठेऊन थोड पाणवठ्यात सहज पाणी किती आहे बघायला म्हणून गेलो एक नजर अवती भवती टाकली; तोच मला एक आवाज आल्याचा भास झाला. मी माझ्या मित्रा कडे बघितले तो कॅमेरा बघण्यात गुंग होता, मी परत इकडे तिकडे बघत होतो, तोच आवाज परत आला. मी इशाऱ्याने माझ्या मित्राला विचारले आवाजाबद्दल तर त्याने माहित नाही; म्हणत मान हलवली, आवाज परत आला आता तो बराच स्पष्ट येत होता, आवाज हा थेट माझा मित्र ज्या ठिकाणी उभा होता तेथुनच येत होता. मी लगेच त्याला माझ्याकडे बोलाऊन घेतलं आणि मी व तो एका झुडपा मागे जाऊन उभे राहिलो. हळू हळू आवाज जवळ येत असल्याचे भासतं होते, आम्ही एकटक त्याच दिशेकडे बघत होतो, माझ्या मनात हा आवाज नक्की कुणाचा बरं असेल हा विचार सुरू होता. आणि मनात आलं बिबट तर नसेल? आणि बघतो तर काय तो बिबटचं होता. आता तो त्या झुडपा मागे आम्हाला दिसत होता. झुडपामुळे तो स्पष्ट दिसत नव्हता, मी पहिल्यांदाच बिबट एवढ्या जवळून बघत होतो, बिबट आणि आमच्यात अंदाजे २०-२५ फुटाचे अंतर होत. तो आम्ही जिथे झुडपा मागे लपून होतो तिकडेच बघत होता. कदाचित आम्ही तिथे असल्याची चाहूल त्याला लागली होती, तो एकटक आमच्या दिशेकडेच बघत होता. मला थोडी भीती पण वाटत होती, मी माझ्या मित्राला आणि स्वतःला हिम्मत देत होतो, आणि सांगत होतो की फक्त शांत रहा, काहीही होणार नाही. तो पाणवठ्यावरती पाणी प्यायला आला होता, पण कदाचित आम्ही तिथे असल्यामुळे तो झुडपाच्या मधून बाहेर निघत नव्हता. मी माझा कॅमेरा हातात घेतला व त्यातून त्याला बघत होतो, त्याचा चेहरा झुडपा मुळे पूर्ण दिसत नव्हता पण त्याचे डोळे व अर्धा चेहरा आणि पोटाचा भाग पूर्ण व शेपटी अर्धवट दिसत होती. मी त्याचे त्याचं अवस्थेत २-३ फोटो काढून घेतलेत. बिबट च्या अंगावरती जे स्पॉट होते ते तर खूपच शोभून दिसत होते, एगदी नक्षी काम केल्या प्रमाणे. मी आता त्याच्यात रमून गेलो होतो व त्याची झुडपा बाहेर येण्याची वाट बघत होतो. कारण त्याला पणवठ्या जवळ जायला रास्ता ओलांडून यायचं होत, आणि तो रस्त्या वरती आला की मला छान फोटो मिळणार होते. त्याच आशेने मी त्याची खूप बेचैन होऊन वाट बघत होतो, पण त्याला काहीतरी दुसरेच मान्य होते. तो मला बघत झुडपा मागुन थोड टेकडीच्या दिशेने  आत जायला निघाला, आणि आम्ही त्याच्याकडे बघतच राहिलो. त्याचा आकार खूप छान होता. तो एक तरुण ३-४ वर्षाचा बिबट असावा, त्याची शरीर बांधणी खूप छान होती, तो खूप सुदृढ असा बिबट होता.

बिबट आता थोडा पुढे निघाला होता, व काटेरी झुडपा मुळे फारसा स्पष्ट दिसत नव्हता. मला त्याला बघण्याचा मोह आवारल्या जात नव्हता, म्हणून मी त्याच्या मागे जाण्याचं ठरवलं तो कदाचित पुढे जाऊन रास्ता ओलांडून विरुद्ध दिशेने परत पाणवठ्यावरती जाणार होता, त्याचमुळे त्याला थोडं पुढे जाऊदेत मी त्याच्या मागे निघालो. त्याला ते मान्य नव्हते, तो क्षणभर थांबला आणि माझ्या कडे बघत गुरं-गुरं ला, त्याचा तो आवाज धडकी भरण्या सारखा होता. मी सुद्धा स्तब्ध झालो, मला थोडी भीती वाटली व मी माघार घेण्याच ठरवलं. उगाच शहाणपण नको अस स्वतःला म्हणत मी मागे आलो. या सगळ्या गोष्टीत माझं मित्रा वरचं लक्षच निघून गेलं तो मात्र घाबरत कसा तरी माझ्या मागे मागे करत होता, त्याच्या चेहऱ्यावरती त्याच्या भितीच्या भावना दिसून पडत होत्या. मी त्याला धीर दिला व घाबरु नको असे संगितले. परत १०-१५ मिनिट आम्ही तिथेच थांबलो, आणि बिबट ज्या दिशेने गेला त्या दिशेला गेलो. थोड दूर गेलो असतं एका ठिकाणी त्याच्या पाऊल खुणा दिसल्यात, त्या त्याने रास्ता ओलांडल्याच दर्शवीत होत्या. तिथे थोडी पाहणी केली असता एक ताजी विष्ठा दिसली कदाचित ती त्याचीच होती, त्यात काही केस होते, कदाचित त्याने रानडुक्कर किंवा हरिणाची शिकार केली असावी.  त्या विष्ठेचा नोंद म्हणून मी एक फोटो काढून परत पाणवठ्याच्या दिशेने गेलो, आम्ही आता एका झाडाच्या आडोश्याला; त्याला दिसणार नाही असे थांबलो होतो. साधारण ३०-४० मिनिटे झाली, परंतु बिबट चा काही पत्ता नव्हता, अखेर

आम्ही निराश होऊन परत निघायचं ठरवलं. माझा मित्र घाबरलेलाच होता आणि थोडा मी सुद्धा! या सगळ्यात आमचे १-२ तास गेले मात्र तिथून निघायची ईच्छा होत नव्हती. पण जावे तर लागेलच! हळू हळू ईकडे तिकडे बघत रास्ता कापत आम्ही गाडी जवळ आली मनात थोडी भीती होतीच, अचानक बिबट जर पुढे आला तर? माझा मित्र अधून मधून मागे बघत होता, थोडा जरी पाचोळ्याचा आवाज आला की आम्ही थांबून शहानिशा करायचो. आम्ही ज्याठिकणी गाडी लावली होती तिथे पोहोचलो. मी माझ्या मित्राला गाडी काढायला लावली आणि मी एकटा पायी पुढे आलो. साधारण १०-१५ फुट गेलो तोच मला परत बिबट च्या पाऊल खुणा दिसल्यात, तो जेव्हा पाणवठ्याकडे आला तेव्हाच्या त्या होत्या. त्या ताज्या पाऊल खुणा होत्या आणि विशेष म्हणजे पहाटे जेव्हा आम्ही गाडीनी गेलो तेव्हा आमच्या गाडीच्या टायरच्या खुणांवर बिबटच्या आताच्या पाऊल खुणा दिसत होत्या. नक्कीच तो आम्ही गेल्या नंतर आमच्या नंतर तेथुन गेला होता.

खरच त्यादिवशीचा अनुभव खुप छान होता पण तितकाच धोकादायकही  माझा मित्र पार घाबरुन गेला होता, आणि शेवटी तो मला बोललाच की ''या पुढे मी कधीही तुझ्या बरोबर जंगलात येणार नाही, मी घरी एकुलता एक आहे यार!'' आणि मला मात्र हसू आवरल्या जात नव्हतं. घरी पोहचे पर्यन्त तो बिबटच डोळ्या पुढे येत होता. त्या नंतर पुढे ३-४ वेळा त्याच जंगलात बिबट पाहण्याचा योग आला.  पोहरा मालखेड जंगलात बिबटची संख्या वाढली आहे, आता १८-२० बिबट तरी जंगलात असावेत. पोहरा-मालखेड जंगल आपल्यासाठी वरदान असून त्याच जतन व संरक्षण झालं पाहिजे. पण हल्ली स्मार्ट सिटि, सौंदर्यीकरण आणि रास्ता रुंदीकरणा मुळे या जंगलाची तोड होत चालली आहे, हे थांबयला पाहिजे. ते फक्त आपल्या नावाखाली रस्ता रुंदीकरण, सौंदर्यीकरण मुळे वन्यजिवांचे किती मोठे नुकसान होईल याची फारशी कुणाला काळजी नाही, वनविभाग सुद्धा या कडे थोड उदासीनतेनेच बघते. तेव्हा आपणच काही तरी करायला पाहिजे, आपल जंगल आपणच वाचवायला पाहिजे. कारण जंगल राहील तर आपण राहू.

*****



# वेक्स व्याख्यानमाला

# "सफर दोन ध्रुवांची"

पर्यावरण व वन्यजीव क्षेत्रातील मान्यवरांचे अनुभव ऐकता यावेत, या क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती, लेखक, सेलिब्रेटी यांना भेटता यावे म्हणून संस्थेने यावर्षीपासून वेक्स व्याख्यानमाला हा नवीन उपक्रम सुद्धा सुरु केला आहे. यातील सफर दोन ध्रुवांची हे मुंबई च्या श्री. कौस्तुभ शेजवलकर यांचे, दोन ध्रुव व जगातील इतर ठिकाणांच्या प्रवासाचे अनुभव कथन करणारे पहिले व्याख्यान श्री. शिवाजी महाविद्यालयात पार पडले. या कार्यक्रमाचा अहवाल समन्वयक सौ. प्राची पालकर यांनी मांडला आहे.

.... संपादक

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था गेल्या कित्येक वर्षांपासून अमरावती शहरात पर्यावरण रक्षणासंबंधी अनेक उपक्रम सातत्याने राबविते आहे. मातीचे गणपती बसवा, निसर्गाशी बांधिलकी दाखवा या उपक्रमांतर्गत अमरावतीतील नागरिकांना मातीचे गणपती उपलब्ध करून देणे, गणपती विसर्जनासंबंधी मार्गदर्शन, जलसाठे प्रदूषित होऊ नये यासाठी जनजागृती, तलावातील कचरा निर्मुलन करून जलचर प्राणी व पक्षी यांचा अधिवास सुरक्षित करण्याचे कार्य, पक्षी निरीक्षण व निसर्ग भ्रमण सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी मित्रांशी व पर्यावरणस्नेही लोकांशी संवाद साधून त्यांच्यात प्राणी, पक्षी, व पर्यावरण रक्षणाची भावना जागृत करण्याचे कार्य, असे अनेक यशस्वी उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबविले जातात. वर्ष २०१७ पासुन संस्थेच्या वतीने WECS Lecture Series हा अजून एक स्तुत्य उपक्रम सुरु करण्यात आला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व निसर्ग प्रेमींना आपापल्या क्षेत्रात भरीव कार्य केलेल्या यशस्वी व्यक्तीचे मार्गदर्शन मिळावे व त्यांच्या मार्गदर्शनाचा व अनुभवाचा फायदा व्हावा या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या या उपक्रमाला पहिल्याच वेळी दोन्ही ध्रुव फिरून आलेले मुंबईचे श्री. कौस्तुभ शेजवलकर हे वक्ते म्हणून लाभले.



श्री. कौस्तुभ शेज्वलकर

श्री. कौस्तुभ शेजवलकर हे आय.टी. क्षेत्रात २० वर्षे वरिष्ट पदावर कार्यरत होते, २०१५ ला त्यांनी स्वेच्छेने निवृत्ती घेऊन त्यांचा फिरण्याचा छंद जोपासण्याचे ठरविले. महाराष्ट्रातील ६० ते ७० गड किल्ले, जंगल भटकंती, १६ ते १८ अभयारण्ये फिरले. तसेच अनेक पदभ्रमण मोहिमा त्यांनी पूर्ण केल्या. आतापर्यंत २४ देशांना त्यांनी भेट दिली. २००२ साली Eurail या रेल्वे पास च्या मदतीने त्यांनी ३१ दिवसात युरोपमधील १२ देश केवळ १,२०,००० रुपयात पाहिले. तसेच २००७ ला दक्षिण ध्रुव व २०१२ ला उत्तर ध्रुव या मोहिमा यशस्वीरीत्या पूर्ण केल्या.

सफर दोन ध्रुवांची हा कार्यक्रम १० जानेवारी २०१७ ला श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे संपन्न झाला. शेजवलकर सरांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून उपस्थित विध्यार्थी व जाणत्या श्रोत्यांना आर्टिक व अंटार्क्टिका या दोन्ही ध्रुवांची भौगोलिक माहिती देऊन उपस्थितांच्या शंकांचे समाधान देखील केले. कौस्तुभ सर डिसेंबर २००७ मध्ये दक्षिण ध्रुवाभोवतीच्या अंटार्क्टिका खंडाची १० दिवसांची सफर करून आलेत. या खंडाचा ९८ टक्के भाग बर्फाच्छदीत आहे व दक्षिण महासागराने वेढला गेला आहे. हा खंड पृथ्वीवरील इतर सात खंडापेक्षा प्रचंड वेगाने वारे वाहणारा व थंड आहे. दक्षिण महासागर नेहमी अस्थिर आणि खवळलेला असतो कारण या थंड व जोरदार वाऱ्याला जमिनीचा

अडथळा कोठेच नाही. ही कठीण पण रोचक सफर करतांना आलेले अनुभव त्यांनी त्यांच्या सादरीकरणात फोटो सहित सविस्तर माहिती देत सादर केलेत. मुंबईहून अर्जेन्टिना मधील उश्वाया ला गेल्यावर तेथून त्यांचा जहाजाचा प्रवास अंटार्क्टिका च्या दिशेला सुरु झाला. त्या जहाजात सर्व सोयी उपलब्ध असून १९९ प्रवासी व १४६ कर्मचारी होते. समुद्र प्रवासाचा काही लोकांना त्रासही झाला, पण अंटार्क्टिका सफर करायची तर इतका त्रास सहन करण्याची तयारी ठेवायलाच हवी. अंटार्क्टिका मधील paradise harbour and neko harbour , palmer station, Arthur harbour, cuverville and enterprise islands, deception island and half moon island, Clarence and elephant island या ठिकाणी छोट्या बोटीतून फिरवण्यात आले. कारण मोठ्या जहाजाला हिमखंडाजवळ नेणे शक्य नसते. सर्वांना ६ ते ७ कपडे एकावर एक घालून बाहेर पडावे लागत असे. सर्वात शेवटी तेथील जीवांना आपल्यामुळे काही जंतुसंसर्ग होऊ नये यासाठी बुटाला सुद्धा निर्जंतुक करून बेटावर खाली उतरण्याची परवानगी असते असे त्यांनी सांगितले. सर्व काही अगदी शिस्तीत व सूचनेनुसार करणे बंधनकारक होते. पेंग्विन आजूबाजूला फिरत होते पण शक्यतोवर त्यांच्या जास्त जवळ जाऊ नये अश्या सूचना होत्या, कुतूहलाने ते जवळ आलेत तर त्यांना इजा होईल असे काहीही करू नये असे बजावण्यात आले होते. एकंदरीत संपूर्ण जीवसृष्टी पेंग्विन, सील, व्हेल, काही पक्षी यांचे नैसर्गिक अधिवास अबाधित राहावी यासाठी आवश्यक त्या सूचना देऊन बोटीतून खाली उतरविले जायचे, शिवाय त्यांनी झेंडे लाऊन निश्चित केलेल्या भागातच फिरायची परवानगी असायची. कौस्तुभ सर बोलत असतांना प्रत्येकाची उत्सुकता तेथील शांततेत जाणवत होती आणि म्हणूनच कदाचित मलाही काही मुद्दे ठळकपणे लक्षात राहिले व मांडता आले. एकंदरीत या व्याख्यानातून अंटार्क्टिका बद्दल सखोल माहिती मिळाली.

त्यांनी आपल्या उर्वरित व्याख्यानात २०१२ साली केलेल्या आर्क्टिक मोहिमेचे देखील अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. आर्क्टिक खंडावर जाण्यासाठी svalbard, Norway येथे जाऊन तेथून जहाजाने समोर जावे लागते. त्यांनी उत्तर ध्रुव मोहीम दक्षिण ध्रुव मोहिमेनंतर ५ वर्षांनी केली. उत्तर ध्रुवाभोवतीची आर्क्टिक परिसराची



व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना सचिव डॉ. जयंत वडतकर व मंचावर उपस्थित श्री. गजानन बापट, श्री. कौस्तुभ शेज्वलकर, प्रा.डॉ. स्मिता देशमुख, प्रा.डॉ. चेतन राऊत

सफर ८ दिवसांची होती, या परिसरात त्यांना grizzly bear, seal, पेंग्विन पाहायला मिळाले. अमरावतीत आले तेंव्हा केपटाऊन ते कैरो हि मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करून ते आले होते. २०१६ ऑक्टोबर - नोव्हेंबर मध्ये डरबन ते आलेक्झांड्रीया असा दक्षिण आफ्रिका, बोट्स्वाना, झाम्बिया, टांझानिया, केनिया, इथिओपिया, सुदान व इजिप्त या आठ देशातून तसेच करू (दक्षिण आफ्रिका ), बयुदा, नुबिअन (सुदान), सहारा (इजिप्त )अश्या चार वाळवंटातून व मकरवृत्त (बोट्स्वाना), विषुववृत्त (केनिया), कर्कवृत्त (इजिप्त) पार करणारा सुमारे १४०००+ किलोमीटरचा प्रवास ४२ दिवसात कारने पूर्ण करून त्यांनी एक भारतीय विक्रम केला. २०१७ च्या India Book of records मध्ये हि मोहीम समाविष्ट केली जाणार आहे. या मोहिमेची संक्षिप्त माहिती त्यांनी व्याख्यानात दिली. कार्यक्रमाचे संचालंन प्रा.डॉ. श्रीकांत वऱ्हेकर यांनी केले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व सौ. प्राची पालकर यांनी आभार प्रदर्शन केले. मंचावर प्राचार्य डॉ. स्वाती देशमुख, प्रा.डॉ. चेतन राऊत, डॉ. जयंत वडतकर, श्री. कौस्तुभ शेज्वलकर व श्री गजानन बापट उपस्थित होते.

WECS व्याख्यानमाला अंतर्गत श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे पार पडलेल्या या ''सफर दोन ध्रुवांची'' या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख व भूगोल विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ.चेतन राऊत यांचे सहकार्य लाभले. भविष्यात असेच विषय या व्याख्यानमाले अंतर्गत मांडण्याचा व मान्यवरांच्या भेटीचा योग घडवून आणण्याचा संस्थेचा प्रयत्न असेल. असे कार्यक्रमाचे समन्वयक सौ. प्राची पालकर व प्रा. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर यांनी सांगितले

# वेक्स वार्तापत्र

## वन्यजीव अभ्यासक श्री गजानन बापट व वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) तर्फे ब्लॅन्केट चे वाटप



मेळघाट व्याघ्र प्रकल्प विस्तीर्ण असा पसरलेला असून तेथील वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी दुर्गम भागात संरक्षण कुटीवर स्थानिक कर्मचारी यांना अव्याहतपणे मुक्कामी राहावे लागते. मेळघाट मध्ये अतिशय दुर्गम भागात संरक्षणाच्या दृष्टीने जवळपास ८० संरक्षण कुटी उभारलेल्या असून या ठिकाणी त्या भागातील वनरक्षक यांचे समवेत स्थानिक आदिवासी तरुण वनमजूर म्हणून कार्यरत असतात, हिवाळ्यात मेळघाट मध्ये कडाक्याची थंडी पडते त्यांना त्या प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्यासाठी थोडी तरी मदत व्हावी या दृष्टीने स्थानिक वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) च्या वतीने व पुणे येथील वन्यजीव अभ्यासक श्री गजानन बापट यांचे तर्फे मेळघाटातील संरक्षक कुटी करिता ६० ब्लॅकेट मदत म्हणून देण्यात आलेत. क्षेत्रसंचालक यांच्या दालनात पार पडलेल्या या छोटेखानी कार्यक्रमात मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक डॉ. दिनेशकुमार त्यागी यांचे उपस्थितीमध्ये ६० ब्लॅकेट चे वाटप श्री गजानन बापट व संस्थेचे सचिव डॉ जयंत वडतकर यांचे हस्ते अकोट वन्यजीव विभाग चे उपवनसंरक्षक श्री प्रमोद्चंद्र लाकरा व सहा.वनसंरक्षक श्री यशवंत बहाळे यांचे सुपूर्द करण्यात आलेत. यावेळी उपवनसंरक्षक श्री. रवींद्र वानखडे, उपवनसंरक्षक श्री. सुनील शर्मा, सहावनसंरक्षक श्री. संजय पारडीकर, श्री यादव तरटे तसेच व्याघ्र प्रकल्प चे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## इकोफ्रेंडली गणेशमुर्ती बनवा कार्यशाळा संपन्न

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेने अमरावती जिल्ह्यात सर्वप्रथम २००५ पासून प्रदुषणमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती अभियान हाती घेतले आहे. हल्ली प्लास्टर ऑफ पॅरिसच्या व रासायनिक रंगानी रंगवलेल्या मुर्त्यांच्या प्रंचड प्रमाणात वापर वाढतोय त्याचे पर्यावरणावर, जलसाठ्यावर तलाव, नद्यावर होणारे दुष्परिणाम पाहता पूरक गणेशोत्सव हि संकल्पना लहान मुलांच्या मनावर बिंबवल्यास त्याचे परिणाम अधिक प्रभावी ठरतील त्या अनुषंगाने संस्थेच्या वतीने भाग्यश्री महाविद्यालय, सुरभी विहार अमरावती येथे शाळेतील विद्यार्थ्यांकरीता मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना प्लास्टर ऑफ पॅरिस चे दुष्परिणाम डॉ. मंजुषा वाठ यांनी पॉवर पाईंट प्रेझेन्टेशन द्वारे सांगितले. अविनाश रोहताळे यांनी सहज सोप्या पध्दतीने मातीची मूर्ती कशी बनवयाची याचे प्रात्याक्षिक देवून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला आणि सर्व विद्यार्थ्यांनी मातीच्या मूर्ती बनवू व तिची स्थापना करु असा निश्चय केला. या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष तुरखेडे, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. अंजली देशमुख, डॉ. मंजुषा वाठ, अरविंद कानसकर, आविनाश रोताळे, डॉ. पंकज कावरे, सावन येवतकर तसेच शाळेचे शिक्षकवृंद उपस्थित होते.

# वेक्स वार्तापत्र

## अमरावती जिल्ह्याची पक्षीसूची प्रकाशीत
## १७ व्या विदर्भ पक्षी मित्र संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी सेवाग्राम येथे प्रकाशन




१७ वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन सेवाग्राम येथे दि. १०-११ डिसेंबर ला पार पडले. या संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यामध्ये वेक्स ने तयार केलेल्या अमरावती जिल्ह्याच्या पक्षीसूची (Checklist of Birds of Amravati District) च्या व्दितीय आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी मंचावर समेलनाध्यक्ष डॉ. व्ही. टी. इंगोले, उद्घाटक मा. प्रवीणसिंह परदेशी तसेच आमदार डॉ. पंकज भोयर, प्रधान मुख्य वन्यजीव संरक्षक मा. श्रीभगवान, जिल्हाधिकारी मा. शैलेश नवाल, पेंच मुख्य वन्यजीव संरक्षक श्रीनिवास रेड्डी, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. गजानन वाघ, व वेक्स संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर व बहार चे अध्यक्ष श्री. किशोर वानखडे उपस्थित होते.

संस्थेने यापूर्वी २०१० मध्ये अमरावती जिल्ह्याच्या पक्षीसूची चे प्रकाशन केले होते. या पक्षी सुची मध्ये पोहरा-मालखेड व महेंद्री राखीव जंगल व सोबतच मेळघाट च्या पक्ष्यांचा सुद्धा समावेश होता. यामध्ये एकूण ३४१ प्रजातींचे पक्षी समाविष्ट होते. वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (Wildlife and Environment Conservation Society) वेक्स हि संस्था गत १६ वर्षापासून अमरावती जिल्हा, यासाठी सतत कार्यरत असून संस्थेने व संस्थेच्या अनेक पक्षी अभ्यासकांनी आतापर्यंत पक्षीविषयक प्रकल्प व संशोधने पूर्ण केले आहेत.

प्रथम पक्षीसुची प्रकाशनानंतर गत ६ वर्षात, संस्थेने विदर्भ प्रदेश तसेच सातपुडा पर्वतरांगेमध्ये पक्षी अभ्यास, संशोधन, नोंदणी व संवर्धन असे अनेक पक्षीविषयक कार्यक्रम, संशोधन प्रकल्प सातत्याने राबविलेत. या कार्यक्रमांमुळे संस्थेचे सदस्य सातत्याने पक्षीअभ्यासात व्यस्त राहिल्यामुळे अनेक नवनवीन नोंदी होत राहिल्या, यामुळेच संस्थेने मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या पक्षीसुचीमध्ये तब्बल २९ पक्ष्यांची भर घातली तर मेळघाट बाहेरील इतर प्रदेशमध्ये सुद्धा ५२ नवीन पक्ष्यांच्या नोंदी केल्यात. नवीन नोंदीपैकी लांब चोचीचा चिखल्या (Long-billed plover) व ह्यूम्स चा लार्क (Hume's Lark) अश्या काही नोंदी ह्या थेट महाराष्ट्रात प्रथम ठरल्या होत्या. याशिवाय अमरावती जिल्ह्यातील काही पक्षी अभ्यासकांनी सुद्धा काही नवीन नोंदी केल्यात. त्यामुळे मेळघाट ची यादी २६५ वरून २९५ इतकी झाली तर संपूर्ण जिल्ह्याची यादी ३४१ वरून ३९२ वर पोहचली. या नवीन नोंदीसह प्रकाशित करण्यात आलेल्या या पक्षीसुचीमध्ये जिल्ह्यात आढळलेल्या काही पक्ष्यांच्या उपप्रजातींचा सुद्धा प्रथमच समावेश करण्यात आला आहे.

संपूर्ण जगाला पर्यावरण समस्यांनी ग्रासले असताना जिल्ह्यातील पक्षीविश्वावर सुद्धा याचा परिणाम जाणवू लागला असून जिल्ह्यातील अनेक पक्षी अधिवास सुद्धा धोक्यात आले आहेत. याचाच परिणाम म्हणून पूर्वीच्या पक्षीसुचीत असलेली संकटग्रस्त पक्ष्यांची यादी वाढून २१ वरून ३४ इतकी झाली आहे, व हि यादी सुद्धा सदर सूचीमध्ये देण्यात आली आहे. या पक्षीसुचीमध्ये मेळघाट, पोहरा-मालखेड व महेंद्री या ठिकाणच्या पक्ष्यांचा समावेश स्वतंत्र दाखवण्यात आला आहे. याशिवाय जिल्ह्यातील पक्षीनिरीक्षण स्थळांची यादी व स्थळदर्शक नकाशा सुद्धा अध्ययावत करून समाविष्ठ करण्यात आला आहे. तसेच मराठी नावे हि नुकत्याच

# वेक्स वार्तापत्र

प्रकाशित झालेल्या प्रमाण यादी नुसार घेण्यात आली आहेत. पक्षिनिरीक्षकांसाठी हि माहिती नक्कीच उपयोगी पडेल. या सूचीचा संदर्भ घेऊन पक्षी अभ्यासक भविष्यात नवीन पक्ष्यांची भर घालीत राहीतील व त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करतील अशी अपेक्षा संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर यांनी व्यक्त केली आहे. या पक्षीसुचीतील नवीन नोंदी, संकलन व अद्यावत करण्यासाठी संस्थेचे अभ्यासक डॉ. जयंत वडतकर, डॉ. राजू कसंबे, डॉ. गजानन वाघ, निनाद अभंग, किरण मोरे, अल्केश ठाकरे, नंदकिशोर दुधे, शिशिर शेंडोकार, गौरव कडू, मनीष ढाकुलकर व सौरव जवंजाळ आदींनी परिश्रम घेतले आहेत. सदर पक्षी सूची संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे तसेच पक्षी सूची संस्थेच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असणार आहे.

## आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवस कार्यक्रम ऊत्साहात संपन्न

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) तर्फे दि. २९ जुलै २०१६ ला आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवसा निमित्य जगदंबा महाविद्यालय अचलपूर येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्राणीशास्त्र विभाग च्या प्रा. डॉ श्रुती गिजरे व वेक्स चे श्री मनीष ढाकुलकर यांनी व विभागातील विध्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी जगदंबा महाविद्यालय अचलपूर चे प्राचार्य डॉ पी. एच. रोहणकर यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.




कार्यक्रमाचे समन्वयक श्री. अल्केश ठाकरे प्रास्ताविक करतांना मंचावर ए.सी.एफ. श्री. विशाल माळी, श्री. परिक्षीत डंभारे, प्रा. बी.बी. कांबळे आदी मान्यवर

प्राणीशास्त्र विभाग, जगदंबा महाविद्यालय अचलपूर व वेक्स संस्थे तर्फे आयोजित या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मेळघाट च्या गुगामल वन्यजीव विभागाचे सहायक वनसंरक्षक श्री विशाल माळी होते तर अध्यक्ष म्हणून विभागप्रमुख डॉ बी. बी. कांबळे हे होते. या शिवाय प्रमुख मार्गदर्शकांमध्ये मेळघाट क्राईम सेल चे श्री परीक्षित डंभारे, वेक्स चे सदस्य श्री अल्केश ठाकरे व प्रा. अमोल रावणकर हे होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून श्री अल्केश ठाकरे यांनी जबाबदारी पार पाडली.

# वेक्स वार्तापत्र

## डॉ. सालिम अली यांची जयंती साजरी : विविध कार्यक्रमांचे आयोजन

वेक्स तर्फे भारतीय पक्षीशास्त्राचे जनक डॉ. सालिम अली यांची जयंती दि. १२ व १३ नोव्हेंबर २०१६ शनिवार व रविवार ला विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरी करण्यात आली. अरण्यार्पण हॉल येथे आयोजीत कार्यक्रमामध्ये डॉ. सालिम अली यांचे कार्य व पक्षीविषयक सादरीकरण प्रा. मुर्तुझा अली सर यांच्या तर्फे ''बर्ड फिडर्स'' चे वितरण करण्यात आले. या प्रसंगी वेक्सचे प्रा.डॉ. गजानन वाघ, श्री.डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, सौ. प्राची पालकर, श्री. किरण मोरे उपस्थित होते.





छत्री तलाव येथे पक्षीनिरीक्षनात सहभागी पक्षीमित्र

तसेच या कार्यक्रमामध्ये स्थानीक तसेच स्थलांतरीत अशा एकुन ३० पक्षीप्रजातींची नोंद घेण्यात आली. संस्थेचे सचिव डॉ.जयंत वडतकर, श्री. किरण मोरे, श्री.अल्केश ठाकरे, श्री.विशाल गवळी, श्री.प्रशांत तिरमारे आदिंनी पक्षांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी श्री सतेज केचे, श्री. अनिल ठाकरे, श्री.सावन येवतकर, आदिसह एकून ३० निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला होता. BNHS तर्फे आयोजित पक्षी गणना (Bird Count) मध्ये संस्थेच्या सदस्यानी भाग घेऊन विविध तलावावर पक्षी गणना केली. या गणनेची माहिती BNHS संस्थेला कळविण्यात आली.

## वन्यजीव सप्ताहा निमित्य जंगलभ्रमण

वेक्स व अमरावती वनविभागाच्यावतीने वन्यजीव सप्ताहा निमित्य पोहोरा जंगलामधे निसर्गभ्रमण व जंगल वाचन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये एकूण ४० विद्यार्थी व निसर्गप्रेमी सहभागी झाले होते.

निसर्गभ्रमणा दरम्यान मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर व वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. अनंत गावंडे यांनी सहभागींना मार्गदर्शन केले व पोहोरा-चिरोडी जंगलाबाबतची माहिती दिली या कार्यक्रमाचे समन्वयक वेक्सचे श्री. सौरभ जवंजाळ व श्री अमीत सोनटक्के यांनी संपूर्ण कार्यक्रम आयोजनाची जवाबदारी यशस्वीरीत्या



पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपवनसंरक्षक श्री. हेमंतकुमार मिना व वन विभागच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.


# वेक्स वार्तापत्र

## सातपुड्यातील किल्ले या पुस्तकाचे लेखक डॉ. जयंत वडतकर समवेत गाविलगड किल्ला भ्रमण


वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) तर्फे दि. ३१ जुलै रविवार ला गाविलगड किल्ला भ्रमण, या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या पदभ्रमण कार्यक्रमास इतिहास व निसर्गप्रेमींचा उदंड प्रतिसाद लाभला. अमरावती, नागपूर, अकोला, अकोट, परतवाडा आदी ठिकाणांहुन एकुन ६० इतिहास व निसर्गप्रेमी सहभागी झाले. यामधे ०८ वर्षापासुन ते ७२ वर्षापर्यंतच्या ऊत्साही नागरीक, विद्यार्थी, छायाचित्रकार, भटकंती व साहस प्रेमींचा सहभाग होता.




या किल्ले भ्रमण कार्यक्रमामधे सातपुड्यातील किल्ले या पुस्तकाचे लेखक तथा वेक्स चे सचिव डॉ. जयंत वडतकर यांनी किल्ल्याचा इतिहास, त्यातील प्राचीन वास्तू, वैशिष्ठपूर्ण प्रवेशद्वारे, प्रचंड बुरुज, उपलब्ध शिलालेख, परंपरागत पाणी साठवन पध्दत व तलाव, उपलब्ध असलेल्या एकूण ०७ तोफा, याबाबत सहभागींना माहीती दिली व किल्ल्यावरिल वेगवेगळ्या कालखंडातील राजवटी, महत्वाचे प्रसंग, ब्रिटीश - नागपूरकर भोसले युद्ध, जौहारचा प्रसंग व किल्याचा संपूर्ण इतिहास इ. बाबत रंजक माहीतीसह मार्गदर्शन केले. संपूर्ण किल्ला भ्रमणास एकूण ०७ तास लागलेत.



या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून संस्थेचे श्री. प्रज्वल लोणारे, अक्षय भोजने व अल्केश ठाकरे यांनी जबाबदारी पार पाडली.



गाविलगडाच्या शार्दुल दरवाज्यासमोर माहीती सांगतांना डॉ. जयंत वडतकर



बाकादरी या उत्तुंग धबधब्या समोर सहभागी चमू

# निसर्गभ्रमण कार्यक्रम

निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन निसर्ग समजून घेणे तसेच सातपुड्यातील निसर्गरम्य व साहसपूर्ण पदभ्रमण मार्गाची ओळख करुन देण्याच्या दृष्टीने वेक्स तर्फे धारखोरा तसेच कलालकुंड-बाकादारी या दोन ठिकाणी निसर्गभ्रमण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## धारखोरा :-

मेळघाट च्या पायथ्याशी व मध्यप्रदेश च्या सीमेवर असलेला उत्तुंग व सौंदर्य पूर्ण असा धारखोरा धबधबा हा साधारणता २००-२५० फुट उंचीचा आहे. परतवाडा ते घटांग रस्त्यावरील बुरडघाट या गावापासून धारखोरा धबधबा साधारणता ४ किमी अंतरावर असून हे





संपूर्ण अंतर कधी नदीकाठाने, कधी जंगलातून तर कधी दरीतून चालत जावे लागते. अश्या या निसर्गसंपन्न मार्गावर रविवार दि. २१ ऑगस्ट २०१६ ला निसर्गभ्रमण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात एकूण ६० निसर्ग प्रेमीं, छायाचित्रकार, पक्षी अभ्यासक, सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे कार्यक्रम प्रमुख म्हणून संस्थेच्या सौ. प्राची पालकर व समन्वयक म्हणून श्री मनिष ढाकुलकर व श्री. अक्षय भोजने यांनी जबाबदारी सांभाळली.




## कलालकुंड- बाकादारी

चिखलदरा व मेळघाट नजीक च्या आडनदी व बेला गावांच्या मध्ये असलेल्या व आडनदी या नदीचा उगम असलेल्या दरीमध्ये असलेल्या सुंदर अश्या कालालकुंड व उत्तुंग अश्या बाकादारी हे दोन धबधबे आहेत. नदीमार्गे घेऊन जाणाऱ्या या निसर्गरम्य वाटेवरील निसर्ग भ्रमणाची सुरुवात परतवाडा ते चिखलदरा या रस्त्यावरील आडनदी या गावापासून होते व येथुन साधारणता ४ किमी कलालकुंड हा धबधबा असून हे संपूर्ण अंतर कधी नदीकाठाने, कधी जंगलातून तर कधी दरीतून चालत जावे लागते. रविवार दि. २५ सप्टेंबर २०१६ ला कलालकुंड-बाकादारी निसर्गभ्रमण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निसर्गभ्रमण कार्यक्रमामध्ये तब्बल ८० निसर्ग प्रेमींनी आपला सहभाग नोंदविला होता. या निसर्गभ्रमण कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर तर समन्वयक म्हणून श्री गौरव कडू, श्री मनीष ढाकुलकर व श्री. अक्षय भोजने यांनी जबाबदारी सांभाळली.

या दोन्ही कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीकांत पालकर, ॲड. मंगेश भागवत या अनुभवी साहस तज्ञ तसेच डॉ. पंकज कावरे व व वनस्पती अभ्यासक डॉ. संजय सातपुते यांचे यावेळी सहभागीना विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे प्रा.गजानन वाघ, श्री. अल्केश ठाकरे, श्री. विशाल गवळी श्री. सुरज ठाकूर श्री. प्रज्वल लोणारे प्रा. राहूल सावरकर, श्री. सतेज केचे आदिंचे मोलाचे सहकार्य लाभले.



# वेक्स वार्तापत्र

## पर्यावरणपुरक रंग होळीचे या विषयावर कार्यशाळा संपन्न

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती चा गृहविज्ञान विभाग व स्थानिक वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स WECS) व यांचे संयुक्त विद्यमाने दि. ४ मार्च २०१७ रोजी होळी साठी नैसर्गिक रंग तयार करणे विषयीच्या एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्याशाळेमध्ये तोमोय स्कूल, एस डी एफ स्कूल, व भाग्यश्री विद्यालय या विविध शाळांचे १५० विद्यार्थी तसेच गृहविज्ञान विभागाच्या विध्यार्थिनी, निसर्गप्रेमी नागरिक व वेक्स चे सदस्य सहभागी झाले होते.



GVISH चे संचालक डॉ. श्रीकृष्ण यावले उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना

कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था चे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण यावले तर प्रमुख ऊपस्थीतांमधे माजी महापौर श्री. मिलिंद चिमोटे, वेक्स चे सचिव डॉ. जयंत वडतकर, प्रदुषण नियंत्रण अधिकारी कु. शितल बिजवे डॉ.गजानन वाघ, डॉ श्रीकांत वऱ्हेकर, प्रा. मंजुषा वाठ, अरविंद कानस्कर आदिंची ऊपस्थीती होती. गृहशास्त्र विभागाच्या डॉ. वंदना जुनघरे, दीपाली धवणे, प्राची गीरी यांची सुद्धा उपस्थिती होती.



प्रा. डॉ. अंजली देशमुख कार्यशाळेमध्ये नैसर्गिक रंग निर्मितीचे प्रात्याक्षिक दाखवितांना

कार्यशाळेच्या प्रारंभी वन्यजीव व पर्यावरणसंवर्धन संस्थेचे सचिव प्रा. डॉ.जयंत वडतकर यांची महाराष्ट्र राज्य जैवविविधता सदस्यपदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या व विभागाच्या वतीने त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला. होळीला आजकाल सर्वत्र रासायनिक रंग वापरले जातात जे मानवी त्वचेला हानिकारक व पर्यावरणाचे प्रदूषण करणारे असतात. त्यासाठी नैसर्गिक वापरणे आज काळाची गरज झाली आहे. कार्यशाळेत डॉ. अंजली देशमुख यांनी निसर्गात उपलब्ध असलेल्या विविध स्रोतांपासून घरगुती पद्धतीने रंग कसे करावे याचे प्रात्यक्षीक दिले. कार्यशाळेत कोरडा गुलाल तसेच ओले रंग कसे तयार करता येतील हे प्रत्यक्ष कृतीतून दाखविण्यात आले. आपल्या सभोवताल सहज मिळणाऱ्या पळस, झेंडू, गुलाब हि फुले व पालक, कढीपत्ता, हळद, करवंद आदीपासून नैसर्गिकरंग कसे तयार करावेत याबाबत नैसर्गिक रंग संशोधक विभाग प्रमुख डॉ. अंजली देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचीन काळात होणारा नैसर्गिक रंगांचा वापर जवळपास लोप पावत चालला आहे तो नव्याने सुरु करून त्याचा वापर व प्रसार हि काळाची गरज आहे, या पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात प्रत्येकाने आपले योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. मंजुषा वाठ यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. दिपाली धवणे ह्यानी केले. सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी कु. अंजु पठाडे, कु. पुजा देशमुख, गौरव कडु, सुरज ठाकुर, विभागातील विध्यार्थिनी परिश्रम घेतलेत. कार्यशाळेचा समारोप कार्यशाळेत तयार झालेल्या निसर्ग रंगांची उधळण करून अतिशय उत्साहात व आनंदात पार पडला.

## वेक्स वार्तापत्र

# मातीचे गणपती बसवा, निसर्गाशी बांधिलकी दाखवा

मातीचे गणपती बसवा, निसर्गाशी बांधिलेकी दाखवा, असे बीद्र गेल्या अकरा वर्षापासून अमरावती शहरामध्ये दरवर्षी प्लास्टर ऑफ पॅरीसच्या विरोधात जनजागृती करुन व भाविकांना मातीच्या गणेश मूर्ती उपलब्ध करुन देण्यासाठी वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) तर्फे दरवर्षी मातीच्या गणपतीचा स्टॉल लावण्यात येत असतो. या वर्षी सुध्दा संस्थेने नेहरु मैदान येथे स्टॉलवर स्थानिक मूर्तिकार रोतळे बंधु यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेल्या व पाणी मिश्रीत नैसर्गिक रंगाने रंगविलेल्या गणेश मूर्ती उपलब्ध करुन देण्यात होत्या. या उपक्रमाचे उद्‌घाटन अमरावती मनपा आयुक्त श्री. हेमंत पवार यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी माजी महापौर मिलींद चिमोटे, प्रा.डॉ. प्रविण रघुवंशी, सचिव डॉ. जयंत वडतकर, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. अंजली देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. गजानन वाघ, सहसचिव प्रा. मंजुषा वाठ, डॉ. रमेश चोंढेकर, कार्यक्रम समन्वयक प्रा.डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, किरण मोरे, अल्केश ठाकरे, प्रसिध्दी प्रमुख सावन येवतकर आदी उपस्थित होते. पाहुण्याचे स्वागत संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर यांनी केले व संस्थेच्या उपक्रमाबाबत मा. आयुक्त यांना संस्थेच्या उपक्रमाची माहिती करुन दिली.

संस्थेच्या स्टॉलवर मातीच्या मूर्ती घेण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भाविकांची संस्थेने आपल्या स्टॉलवर मुर्ती सोबतच प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मुळे होणारे प्रदुषणाचे दुष्परिणाम दाखविणारे पोस्टर्स लावले होते. तसेच पत्रकांच्या माध्यमातुन संस्थेच्या स्वयंसेवकांनी पर्यावरण संवर्धन व मातीच्या गणपतीबाबत जनजागृती केली.

मागील वर्षी पासून संस्थेने कागदाच्या लगद्यापासून मुर्ती तयार करुन त्या नैसर्गिक रंगाने रंगवून त्याचा प्रसार करण्याच्या दृष्टीने त्यासंबंधी मुर्त्यांची प्रदर्शनी सुध्दा लावण्यात आली होती. संस्थेच्या स्टॉलवर एक सहा इंच ते अडीच फुट उंची पर्यंतच्या मुर्त्या उपलब्ध होत्या.

संस्थेच्या या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सभासद प्रा.डॉ. रमेश चोंढेकर, डॉ. पंकज कावरे, डॉ. दीपलक्ष्मी कुळकर्णी, डॉ. रीना लहारिया, डॉ. रमेश चोंढेकर, गौरव कडू, सौरभ जवंजाळ, मनीष ढाकुलकर, प्रशांत तिरमारे, अरविंद कानस्कर, सिल्विया पावडे, प्रथमेश तिवारी, शुभम वाघ, जगदेव इवाने, अंजली पठाडे, अनुप तायवाडे, अक्षय भोजने आदीचे मोलाचे सहकार्य लाभते .





# वेक्स वार्तापत्र

## जागतिक चिमणी दिवसा निमित्य विविध कार्यक्रमांचे आयोजन, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) चा उपक्रम

वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (वेक्स) तर्फे दि. २० मार्च या जागतिक चिमणी दिवसाचे औचित्यं साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम दि.१८ ते २० मार्च या तीन दिवसात संस्थेच्या पक्षी निरीक्षकांनी विविध ठिकाणी चिमणी गणना मध्ये भाग घेऊन चिमणी व शहरातील इतर सामान्य पक्ष्यांची गणना केली. संस्थेतर्फे प्लायवूड पासून तयार केलेली आकर्षक घरटी तसेच संस्थेच्या स्वयंसेवकांनी टाकाऊ वस्तुपासून तयार केलेली घरटी तसेच मातीची पाण्याची भांडी चे वितरण व प्रदर्शन तसेच जनजागृती करिता स्थानिक गाडगे नगर येथे सोमवार दि. २० मार्च रोजी स्टॉल लावण्यात आला होता. या स्टॉल चे उद्घाटन महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बर्डेकर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून अमरावती चे उपवनसंरक्षक मा. हेमंतकुमार मीना, नगरसेविका सौ. सुरेखाताई लुंगारे, श्री. विनायक साखरेकर संस्थेचे सचिव डॉ. जयंत वडतकर, डॉ. गजानन वाघ व कार्यक्रम समन्वयक श्री. सौरव जवंजाळ, आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शालेय



स्टॉलच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहूणे डॉ. विलास बर्डेकर उपवनसंरक्षक श्री. हेमंतकुमार मिना, श्री.विनायक साखरेकर सर, नगरसेविका सुरेखाताई लुंगारे यांच्या समवेत वेक्सचे पदाधिकारी व कार्यकर्ते

विद्यार्थ्यांना मातीची पाण्याची भांडी व टाकाऊ वस्तुपासून तयार केलेली चिमणीची घरटी वाटप करण्यात आलीत.संस्थेतर्फे तयार



कार्यक्रमाचे समन्वयक श्री. सौरभ जवंजाळ प्रमुख पाहुणे डॉ. विलास बर्डेकर यांचे स्वागत करतांना.

करण्यात आलेले चिमणी विषयाचे माहिती पत्रक उपस्थितांना व स्टॉल ला भेट देणाऱ्यांना वितरीत करण्यात आलीत. यावेळी प्रा. मुर्तझा अली, श्री. यादव तरटे तसेच संस्थेचे श्री. किरण मोरे, सौरव जवंजाळ, अमित सोनटक्के, प्रशांत तीरमारे, शुभम वाघ, सौ. प्राची पालकर, डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, विशाल गवळी, डॉ. तुषार अंबाडकर, डॉ. पंकज कावरे, सावन येवतकर, मनीष ढाकुलकर आदी उपस्थित होते.



वेक्सद्वारे तयार करण्यात कृत्रिम चिमण्यांची घरटी

# वेक्स वार्तापत्र

## वेक्स तर्फे वृक्षारोपण संपन्न
## वन महोत्सवात वृक्ष संवर्धनाचा संकल्प

महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या चार कोटी वृक्ष लागवड योजनेमध्ये वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती (WECS) सुद्धा आपल्या परीने सहभागी झाली असून या अंतर्गत संस्थेतर्फे यावर्षी किमान १०० वृक्ष लागवड करून, संस्थेच्या सदस्यांचे व सहकारी सस्थांचे मदतीने संगोपन करण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले होते. या अंतर्गत वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेतर्फे विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत पहिला कार्यक्रम वेक्स व विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेचा (GVISH) गृहविज्ञान विभाग यांचे संयुक्तपने शेवगा (Drumstick tree / Moringa oleifera) या आहारात उपयुक्त व आयुर्वेदिक महत्व असलेल्या २५ झाडांचे रोपण करून साजरा करण्यात आला. यावेळी विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेचा (GVISH) गृहविज्ञान विभागाच्या सेंद्रिय शेती परिसरात एकूण २५ शेवगा झाडांची रोपे लावण्यात आलीत व या झाडांना जागविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.



दि. ०५ जुलै रोजी पार पडलेल्या या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण श्री. रवींद्र वानखडे तसेच उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ. अर्चना नेरकर यांची उपस्थिती होती. वेक्स संस्थेचे सचिव तथा राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य डॉ. जयंत वडतकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर गृहविज्ञान विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी संस्थेचे सदस्य प्रा. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, सौ. प्राची पालकर, सहसचिव डॉ. मंजुषा वाठ, डॉ. पंकज कावरे, डॉ. तुषार अंबाडकर, मनीष ढाकुलकर, श्री. विशाल गवळी, श्री. सावन येवतकर, तसेच गृहविज्ञान विभागाचे डॉ. वंदना जुनघरे, डॉ. राजकुमार कांबळे, प्रा. प्राची गिरी, श्रीमती आशा किटके आदीच्या हस्ते सुद्धा यावेळी वृक्षारोपण करण्यात आले.



या अंतर्गत दुसरा वृक्षारोपण कार्यक्रम WECS व माधवबाग हृदयरोग क्लीनिक यांचे संयुक्तपने कठोरा रोड स्थीत आनंद विहार कॉलनी येथील नागरिकांचे सहयोगाने दि. ९ जुलै २०१७ रविवारी सकाळी संपन्न झाला. यावेळी प्रभाग क्र. १ च्या नगरसेविका सौ. मंजुश्री प्रशांत महल्ले यांचे हस्ते वृक्ष लाऊन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमास नगरसेवक श्री. प्रशांत डवरे तथा वेक्स चे सचिव डॉ जयंत वडतकर तथा परीसारीतल नागरिक तथा वेक्स च्या अनेक सभासदांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. पंकज कावरे यांनी पाहुण्यांचा परिचय तथा उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर कठोरा रोड स्थित आनंद विहार कॉलनी येथे एकूण २५ वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी वेक्स स्ंस्थेचे प्रा. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, सौ. प्राची पालकर, श्री. गौरव कडू, श्री. सावन येवतकर, डॉ. संदीप वाघुळे आदी सदस्यांचे हस्ते सुद्धा वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. पंकज कावरे डॉ. रुपाली कावरे, श्री. मालठाणे, श्री. डहाके, श्री. पाटील आदींचे सहकार्य लाभले.

# वेक्स वार्तापत्र



तिसरा वृक्षारोपण कार्यक्रम कठोरा रोड स्थीत कल्पना नगर, आनंद विहार कॉलनी जवळ, अमरावती येथील नागरिकांचे सहयोगाने दिनांक १६ जुलै २०१७ रोजी संपन्न झाला. यावेळी प्रभाग क्र. १ नगरसेवक श्री. प्रशांत डवरे यांचे हस्ते वृक्ष लाऊन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमास वेक्स चे सचिव डॉ जयंत वडतकर तथा परीसरातील नागरिक तथा वेक्स च्या अनेक सभासदांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संदीप वाघुळे यांनी पाहुण्यांचा परिचय तथा उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर कठोरा रोड स्थित कल्पना नगर, येथे एकूण २५ वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी वेक्स संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. गजानन वाघ, सदस्य प्रा. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, श्री. किरण मोरे, डॉ. पंकज कावरे, श्री. सौरभ जवंजाळ, डॉ. तुषार अंबाडकर, प्रा. डॉ. रवींद्र सरोदे, श्री. अमित सोनटक्के, श्री. सावन येवतकर सौ. शुभदा मोरे आदींची ऊपस्थीती होती. यावेळी कल्पना नगर येथील डॉ. संदीप वाघुळे, सौ. प्रिती वाघुळे, सौ. सुषमा पाटील, सौ. शारदा ढवळे, सौ. चौधरी, श्री. राऊत, श्री. गजानन चौधरी, श्री. प्रविण पाटील, श्री. गुल्हाने सर,श्री. अरुण विधाते आदींच्या हस्ते सुद्धा वृक्षारोपण करण्यात आले.

## ग्रेट बॅकयार्ड बर्ड काउंट मधे देशभरातून उत्स्फूर्त सहभाग, विक्रमी प्रजातींची नोंद विदर्भातून घेतला अनेकांनी सहभाग

जागतिक पातळीवर दरवर्षी होणारा ग्रेट बॅकयार्ड बर्ड काउंट (GBBC) यावर्षी दि. १७ ते २०फेब्रुवारी दरम्यान पार पडला भारतातून यावर्षी सुद्धा ११०० पेक्षा पक्षीनिरीक्षकांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवून ७५० पेक्षा जास्त पक्षांच्या प्रजातींच्या सात लाखांच्या वर पक्ष्यांची नोंद घेतली. प्रजातींच्या बाबतीत यावर्षी सुद्धा क्रमवारीत आपल्या देशाचा दुसरा क्रमांक राहिला आहे. संपूर्ण देशातून जवळपास २८ राज्यांमधून पक्षीनिरीक्षकांनी या पक्षी मोजणी मध्ये भाग घेतला असून महाराष्ट्रामधून यावर्षी कान्याकोपऱ्यातून पक्षीनिरीक्षक सहभागी झाले होते, याचेच फलित म्हणजे संपूर्ण देशात महाराष्ट्रातून सर्वात जास्त प्रजाती नोंदविल्या गेल्यात. यामध्ये मुंबई, पुणे, प. घाट व विदर्भातून मोठ्या प्रमाणात पक्षीनिरीक्षकांचा सहभाग व पक्षी प्रजाती नोंदविल्या गेल्यात.

पक्षी निरीक्षण हा आनंददायी छंद असला तरी त्याला दुसरी बाजू हि शास्त्रीय ज्ञानाची आहे. लोक विज्ञानावर (Citizen Science) आधारित या कार्यक्रमामधून गोळा होणारी माहिती ही पक्ष्यांबद्दलचे अनेक अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. यासाठी अलीकडे वेगवेगळ्या प्रकारच्या पक्षी गणना घेण्यात येत असतात.



शासकिय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्था अमरावती च्या कॅम्पस् बर्डकाऊंट मध्ये सहभागी प्राणीशास्त्र विभागाचे विद्यार्थी,प्राध्यापक वृंद व संस्थेचे पक्षीअभ्यासक

कॅम्पस बर्ड काउंट (Campus Bird Count) अंतर्गत देशात एकूण २९३ ठिकाणांची नोंद झाली होती यामध्ये महाराष्ट्रातून ४४

# वेक्स वार्तापत्र

कॅम्पस ची नोंद करून बाजी मारली असून यामध्ये विदर्भातील १४ ठिकाणांचा समावेश होता. विदर्भातून यावर्षी फक्त गडचिरोली व गोंदिया वगळता ०९ जिल्ह्यांमधून या काउंट मध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्या गेला आहे. यामध्ये सर्वात जास्त सहभाग हा अमरावती जिल्ह्यातून नोंदविल्या गेला असून यामध्ये २० पक्षीनिरीक्षकांसह २०० विध्यार्थी व निसर्ग प्रेमी नागरिकांनी भाग घेऊन १९० प्रजातींची नोंद घेतली. कॅम्पस बर्ड काउंट अंतर्गत अकोला येथे पं. दे. कृषी विद्यापीठ परिसर, अमरावती जिल्ह्यातून वडाळी बांबू गार्डन, अमरावती विद्यापीठ, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, तसेच काही अभियांत्रिकी महाविद्यालयात व परतवाडा येथे विध्यार्थ्यांसमवेत पक्षी नोंदणी करण्यात आली. नागपूर येथे सुद्धा राजभवन जैवविविधता पार्क व हिस्लॉप कॉलेज येथे कॅम्पस बर्ड काउंट घेण्यात आला. यामध्ये GVISH च्या प्राणीशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा.डॉ. वर्षा सा झाडे, प्रा.डॉ. वैभव ठाकरे, डॉ. मिलींद काळे, प्रा. पी.एच. रोहनकर, डॉ. ज्योती चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

विदर्भातून सर्वात जास्त २०५ पक्षी प्रजाती अकोला येथून नोंदविण्यात आल्यात. सहभागी पक्षीनिरीक्षकांनी आपल्या सर्व नोंदी ई-बर्ड (eBird India) या संकेतस्थळवर टाकल्या असून या माहितीतून पक्ष्यांविषयी महत्वपूर्ण माहिती पुढे येणार आहे विदर्भातील विविध ठिकाणांहून मिळालेल्या उत्स्फूर्त सहभागामध्ये अकोला येथून श्री शिषिर शेंडोकर, श्री. मंगेश तायडे, श्री. रवी धोंगडे अमरावतीहून डॉ. जयंत वडतकर, वेक्स संस्थेचे श्री अल्केश ठाकरे श्री. विशाल गवळी, श्री सौरभ जवंजाळ, श्री मनीष ढाकुलकर,सौ. प्राची पालकर, श्री यादव तरटे, डॉ. मिनाक्षि राजपूत, मनीष घुरडे, डॉ. तुषार अंबाडकर, नागपूर वरून श्री गौरव कडू, कु. ऋतुजा कुकडे वाशीम वरून श्री. मिलिंद सावदेकर, भंडारा येथून श्री. स्वप्निल वानखडे, बुलडाणा येथून विजय खंडागडे व नागभीड जी. चंद्रपूर येथून श्री नरेंद्र लोहबरे, वर्धा येथून श्री दिलीप विरखडे व यवतमाळ येथून श्री जयंत अत्रे व प्रा. धर्मेंद्र तेलगोटे यांनी यामध्ये सहभाग नोंदविला.



श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील कॅम्पस् बर्डकाऊंट मध्ये सहभागी विद्यार्थी व संस्थेचे पक्षीअभ्यासक

## वेक्स वार्तापत्र

# कॉमन बर्ड मॉनेटरींग प्रोग्राम

बीएनएचएस तसेच वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती आणि अरण्यम सोसायटीद्वारे सामान्य पक्षी गणना कार्यक्रम (कॉमन बर्ड मॉनेटरींग प्रोग्राम) १५ व १६ एप्रिल रोजी राबविण्यात आला. त्यानुसार दोन चौरस कि.मी. च्या ग्रिडवर ट्रान्झेट लाईन सर्व्हे करण्यात आला. एकूण सात ग्रीडवर ५५ प्रजातींचे ८६० पक्ष्यांची नोंद झाली. या मोहिमेमध्ये एकूण २३ पक्षीप्रेमींनी भाग घेतला.

वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था प्रत्येक ऋतूत सात ग्रीडवर पक्षी गणना करीत असते. या गणनेत उपक्रमाचे राज्य समन्वयक डॉ. जयंत वडतकर, जिल्हा समन्वयक किरण मोरे, सौरभ जवंजाळ, विशाल गवळी,अमित सोनटके सर्वेश मराठे, गौरव कडू व इतर सहभागी झाले होते. निसर्गातील पक्ष्यांचे संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. परंतु संवर्धन करण्याअगोदर पक्ष्यांचा अधिवास, त्यांची संख्या किती आहे हे कळणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यभरातील सर्वसामान्य पक्षांचे सर्व्हेक्षण केले जाते.

विदेशातून आपल्याकडे स्थलांतरीत होणारे पक्षी तसेच संकटग्रस्त प्राजातींचा सामन्यपणे अभ्यास केला जातो. परंतु आपल्या सभोवताली वावरणाऱ्या, दाणे टीपण्यासाठी घरात येणाऱ्या सर्व सामान्य पक्ष्यांबाबत जास्त दखल घेतली जात नाही. या सर्वसामान्य पक्ष्यांच्या सर्व्हेक्षणासाठी पर्यावरण क्षेत्रात कार्यरत BNSH व WECS तसेच अरण्यम संस्थेने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमात पक्षीमित्र, निसर्गप्रेमी, विद्यार्थी व होशी नागरिकांना शास्त्रीय पध्दतीने ट्रांझेट लाईन प्रणालीद्वारे सर्व्हेक्षण केले जाते. या निष्कार्षातून पक्षांचे अधिवास क्षेत्रातील बदल आदींची अभ्यासपूर्ण माहिती मिळते.



छत्री तलाव येथील सामान्य पक्षी गणना कार्यक्रमात सहभागी जिल्हा समन्वयक श्री. किरण मोरे,सौरभ जवंजाळ, विशाल गवळी, अमित सोनटके, सर्वेश मराठे, गौरव कडू व इतर पक्षीमित्र




हिवाळी CBMP पक्षी गणना करतांना वेक्स चे पक्षी अभ्यासक




पावसाळी CBMP पक्षी गणना करतांना वेक्स चे पक्षी अभ्यासक

# वेक्स वार्तापत्र

## 'केम्ब्रीज' च्या संशोधक ओडीसी डेव्हीस यांची अमरावतीच्या वेक्स ला भेट

मुबईच्या 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' या संस्थेतर्फे राबविल्या जाणाऱ्या 'इंडियन बर्ड कंझर्व्हेशन नेटवर्क' या प्रकल्पाचे मुल्यांकन करण्यासाठी 'युनाईटेड किंगडम' येथील केब्रीज विद्यापीठाच्या महिला संशोधक ओडिसी डेव्हीस या भारतात आल्या होत्या. दि.१९-२० जून २०१६ ला त्यांनी अमरावतीला वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था अमरावतीच्या सहकारी संस्थेच्या भेट देऊन पक्षी अभ्यासकांशी चर्चा केली.




अमरावती येथील पक्ष्यांसदर्भात कार्य करणारी 'वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था' ही आयबीसीएन प्रकल्पाची सहकारी संस्था आहे. संस्थेच्या सभासदांसह जिल्ह्यातील पक्षी अभ्यासकांसमवेत चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत जिल्ह्यातील २८ पक्षी अभ्यासक उपस्थित होते.

व्यासपीठावर ओडिसी डेव्हीस, बीएनएचएसचे नंदकिशोर दुधे, सिध्देश सुर्वे, वेक्सचे सचिव डॉ. जयंत वडतकर,प्रा. गजानन वाघ व संस्थेचे मार्गदर्शक श्री. मिलींद चिमोटे उपस्थित होते. यावेळी पक्षी संस्थांच्या कार्याचा, पक्षी अभ्यासाचा व आयबीसीएन समवेतच्या प्रकल्पाचा आढावा डॉ. जयंत वडतकर यांना सादर केला. त्यानंतर ओडीसी डेव्हिस यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत विविध विषयांवर चर्चा करुन पक्षी संवर्धन व आयबीसीएन नेटवर्क मजबुत करण्यासाठी काय करता येईल. यावर प्रकाश टाकला. या चर्चेत श्रीकांत वऱ्हेकर, प्राची पालकर, किरण मोरे, अल्केश ठाकरे, अमोल रावणकर, सौरभ जवंजाळ,गौरव कडू यानीही सहभाग घेतला.या कार्यक्रमास प्रा. दिलीप हांडे, श्री. विशाल गवळी, मनीष ढाकुलकर, प्रज्वल लोणारे प्रशांत तिरमारे, श्री. अरविंद कानसकर, श्रीकांत पालकर, शुभम वाघ, क्रांती रोकडे, श्री. हयात यांची उपस्थिती होती.

दुसऱ्या दिवसी ओडिसी डेव्हीस यांनी जिल्ह्यातील महत्वपूर्ण पक्षी अधिवास असलेल्या ''महेंद्री राखीव जंगलास'' सुध्दा भेट दिली व तेथील पक्षी विश्व जाणून घेतले. यावेळी त्यांनी वरुड येथील महात्मा फुले महाविद्यालय व अमरावती येथे श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयास सुध्दा भेट दिली व आयबीसीएन सदस्यांसोबत चर्चा केली. महेंद्री येथील भेटी दरम्यान डॉ. आशिष चौधरी, श्री. चंद्रकांत शिंगाखाडे, प्रा.डॉ. संजय सातपुते यांचे सहकार्य लाभले.



# वेक्स चे पक्षी अभ्यासक

वेक्स आज संपूर्ण महाराष्ट्रात पक्षी अभ्यास, नोंदणी व संवर्धनासाठी एक अग्रगण्य संस्था म्हणून नावरुपास आली असून संस्थेचे खालील पक्षी अभ्यासक वेगवेगळ्या विषयांमध्ये अतिशय शास्त्रोक्त पध्दतीने व विषेश म्हणजे सातत्याने पक्षी अभ्यासामध्ये व्यस्त असतात.संस्थेने गेल्या ५-६ वर्षाच्या अभ्यासामध्ये पूर्ण केलेले रानपिंगळा व OWI या पक्षांवरील आंतरराष्ट्रीय संस्थासोबत पूर्ण केलेले प्रकल्प, संस्थेच्या सदस्यांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषद व महाराष्ट्र व विदर्भ स्तरीय पक्षीमित्र संमेलनांमधील अभ्यासपूर्ण सादरीकरणे व सहभाग, विविध ठिकाणी लिहीलेले अभ्यासपूर्ण लेख, माळराणावरील पक्षी अभ्यास, स्थलांतरीत पक्षी व परतीच्या प्रवासाचा पक्षी अभ्यास, तनमोर शोध प्रकल्प, पक्ष्यांच्या शीकारी बाततचे कार्य, जखमी पक्षी सेवा व सुश्रृषा आदी विषयांवर वेगवेगळे पक्षी अभ्यासक करीत असलेले कार्य व अलीकडेच २०१६-१७ मध्ये संस्थेने प्रकाशित केलेली ''अमरावती जिल्ह्याच्या पक्षी सुचीची दुसरी आवृत्ती'' या व अशा अनेक कामामधुन संस्थेचे पक्षीविषयक कार्य दिसून येते.

नुकत्याच प्रकाशित झालेल्या पक्षीसुची मध्ये संस्थेच्या सदस्यांनी जिल्ह्यासाठी तब्बल ५२ पक्षी नव्याने समाविष्ट केले असून, मेळघाटच्या यादीतही २९ पक्ष्यांची भर घातली आहे. पक्ष्यांच्या उपप्रजातींचा अभ्यास व त्यांचा पक्षीसुची मध्ये समावेश प्रथमच करण्यात आला आहे. संस्थेचे पक्षी अभ्यासक श्री किरण मोरे व श्री. निनाद अभंग यांनी गवताळ माळरानावरील पक्षांचा अभ्यास करीत असतांना लार्क या पक्ष्यावर उत्कृष्ट अशा माहितीपटाची निर्मिती केली आहे. तसेच श्री. किरण मोरे यांचे पक्ष्यांवरील अभ्यासपूर्ण लेख विविध मासिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. संस्थेचे अकोला येथे कार्यरत पक्षी अभ्यासक श्री. शिषिर शेंडोकार हे अकोल्या जिल्ह्याच्या पक्षी अभ्यासासाठी कार्यरत असून त्यांनी अनेक नव्या प्रजातींची नोंद घेण्यात यश मिळविले आहे. तसेच त्यांच्या अभ्यासावर आधारित लघुशोध निबंध नियतकालीकांमधून प्रकाशित झाले आहेत. संस्थेचे सदस्य सौरभ जवंजाळ सध्या तनमोर पक्षी अभ्यास प्रकल्पावर सुध्दा कार्य करीत असून त्यामध्ये जिल्ह्यातील तनमोरच्या अधिवासांचा प्राथमिक अभ्यास पूर्ण झालेला आहे.

डॉ. जयंत वडतकर, प्रा.डॉ. गजानन वाघ यांनी आपला पक्षी अभ्यास आंतरराष्ट्रीय हॉर्नबिल परिषदेमधून मांडला, श्री. किरण मोरे, शिषिर शेंडोकार, गौरव कडू, सौरभ जवंजाळ,प्रा.डॉ. गजानन वाघ, डॉ. जयंत वडतकर आदींनी आपला पक्षी अभ्यास पक्षीमित्र संमेलनामध्ये सादर केला याशिवाय नवोदित पक्षी निरिक्षक श्री. मनिष ढाकुलकर, प्रशांत तिरमारे, ऋतुजा कुकडे, डॉ. तुषार अंबाडकर, अमित सोनटक्के, विशाल गवळी आदी पक्षी निरिक्षक जिल्ह्यामध्ये पक्षी अभ्यासासाठी सातत्याने कार्यरत असतात.


डॉ. जयंत वडतकर


प्रा. डॉ. गजानन वाघ


श्री. किरण मोरे


श्री. अल्केश ठाकरे


श्री. निनाद अभंग


श्री. शिषिर शेंडोकार


श्री. गौरव कडू


श्री. सौरभ जवंजाळ


श्री. मनिष ढाकुलकर


श्री. विशाल गवळी


श्री. अमित सोनटक्के


डॉ. तुषार अंबाडकर

# गौरवाचे क्षण

## प्रा.डॉ. गजानन वाघ

* महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या वन्यजीव छायाचित्र स्पर्धा २०१३ मध्ये व्दितीय क्रमांकाचे पारितोषीक
* महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या वन्यजीव छायाचित्र स्पर्धा २०१४ मध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषीक
* पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन व पर्यावरण शिक्षण केंद्र (C.E.E.) तर्फे दिला जाणारा २०१५ चा सृष्टिमित्र पुरस्कार



म.रा. जैवविविधता मंडळाच्या वन्यजिव छायाचित्र स्पर्धेचे पारितोषीक, मा.ना. सुधिरजी मुनगंटीवार यांचे हस्ते स्विकारतांना प्रा. डॉ. गजानन वाघ




मा.ना. रामदासजी कदम यांच्या हस्ते सृष्टिमित्र पुरस्कार स्विकारतांना श्री गौरव कडू

## श्री. गौरव कडू

* पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन व पर्यावरण शिक्षण केंद्र (C.E.E.)पुणे तर्फे दिला जाणारा सृष्टिमित्र पुरस्कार २०१४, (छायाचित्र गट)
* पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन व पर्यावरण शिक्षण केंद्र (C.E.E.)पुणे तर्फे दिला जाणारा सृष्टिमित्र पुरस्कार २०१५, (छायाचित्र गट)
* वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१४, छायाचित्र स्पर्धेतील पुरस्कार
* युवा महोत्सव, रायसोनी अभियांत्रीकी महाविद्यालया मधील २०१४ च्या वन्यजिव छायाचित्र स्पर्धेमध्ये पुरस्कार

## श्री. किरण मोरे

* विदर्भस्तरीय वन्यजिव छायाचित्र स्पर्धा अमरावती प्रथम पारितोषीक - २०१३
* २७ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन, नागपुर च्या राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धे मध्ये प्रथम पारितोषीक - २०१४
* वन्यजिव सप्ताहानिमित्त, मेळघाट व्याघ्रप्रकल्प तर्फे आयोजीत विदर्भ स्तरीय छायाचित्र स्पर्धेमध्ये तृतीय पारितोषीक -२०१२
* वर्धा येथे आयोजीत राष्ट्रिय पातळीवरील छायाचित्र स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ पारितोषीक-२०१४



२७ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन,नागपुर येथे संमेलनाध्यक्ष डॉ.अनिल पिंपळापुरे यांचे हस्ते प्रथम पारितोषीक स्विकारतांना श्री किरण मोरे.



केंद्रीय परिवहन व राजमार्ग मंत्री मा.ना. नितीनजी गडकरी यांचे हस्ते पुरस्कार स्विकारतांना श्री प्रज्वल लोणारे

## श्री. प्रज्वल लोणारे

* ऑरेंज सिटी फोटाग्राफर्स असो.तर्फे आयोजीत विदर्भस्तरीय छायाचित्र स्पर्धेमध्ये, प्रथम पारितोषीक-२०१६

# क्षणचित्रे



थोर पक्षीअभ्यासक मारुती चित्तमपल्ली यांचे सोबत पक्षीअभ्यास विषयक चर्चा व भेटी दरम्यान वेक्स चे पक्षीअभ्यासक किरण मोरे, शिषीर शेंडोकार, डॉ. जयंत वडतकर व सौरभ जवंजाळ



सावंतवाडी येथील २९ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनामध्ये सहभागी वेक्सचे पक्षी अभ्यासक



लार्क पक्षीप्रजातींच्या अभ्यास प्रकल्पामध्ये किरण मोरे व निनाद अभंग यांनी गवताळ माळरानावर अनेक तास घालविलेत, यातुन **LARK :** The Shadow Of GrassLand या माहितीपटाची निर्मीती झाली.




अंबाजोगाई येथील ३० व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनामध्ये लार्क अभ्यास प्रकल्पावरील सादरीकरण करतांना किरण मोरे



प्रोफेसर पिलाई पुनस्वाड यांचे ''हॉर्नबिल्स ऑफ द वर्ल्ड'' हे पुस्तक स्वीकारतांना प्रा.डॉ. गजानन वाघ, डॉ. जयंत वडतकर




सातव्या आंतरराष्ट्रीय हॉर्नबिल परिषदेमध्ये भारतातील हॉर्नबिल अभ्यासक, डावीकडून प्रा. डॉ. गजानन वाघ, डॉ. जयंत वडतकर परिषदेच्या कार्यकारी सचिव अस्मा मुसा, SCON चे बालसुब्रमनियन, डॉ. अनिल पिंपळापूरे, प्रसिध्द हॉर्नबिल संशोधक डॉ. अपराजिता दत्ता, डॉ. रोहीत नानिवडेकर आदी



सुगरण पक्षी विणवसाहत अभ्यास सहलीमध्ये BNHS चे डॉ. राजु कसंबे मार्गदर्शन करतांना



संस्थेच्या नैसर्गीक रंग प्रकल्पाबाबत मनपा आयुक्त मा. हेमंतकुमार पवार यांना माहिती देतांना संस्थेच्या अध्यक्षा प्रा.डॉ. अंजली देशमुख



वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती

Shree Gurudeo PRINTERS AMT. MO. 9766656602